दैनिक

# लोकरक्षणाय

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com  epaper.lokrakshanay.com  dainiklokrakshanay@gmail.com  + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२६६ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, रविवार, १० मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-


# ‘एकदा सत्ता माझ्या हातात द्या, सगळे भोंगे बंद करून टाकतो’

## मनसे वर्धापन दिनानिमित्त राज ठाकरे यांची आक्रमक भूमिका

**नाशिक, भावना जैन :**

मशिदींवरील भोंग्यावरून मनसेनं पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतली आहे. मनसेच्या १८ व्या वर्धापनदिनानिमित्त अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षाच्या शेकडो कार्यकर्त्यांना संबोधीत केलं. यावेळी ठाकरेंनी महायुती सरकारवर तोफ डागली. ते म्हणाले, राजकारणात सध्या दुसऱ्याची मुलं कडेवर खेळतात. मला माझीच मुलं कडेवर खेळवायची आहेत. मनसेने प्रत्येक आंदोलन सुरु करुन त्याचा शेवटही केला. समुद्रात दर्गा बांधत होते आम्ही बंद पाडला. दर्गा होतोय हे सरकारच्या लक्षात का आले नाही. मनसे एवढी आंदोलनं कोणत्याही पक्षानं केली नाही. माझ्या सहकाऱ्यांनी आंदोलन केलं, लाठ्या काठ्या खाल्ल्या, केसेस घेतल्या. तुमच्या सगळ्यांतच्या कष्टमधून हे राज्य एकदा माझ्या हातात द्या सगळे भोंगे एकसाथ बंद करुन टाकतो, असं आवाहनही राज ठाकरेंनी जनतेला केलं आहे.

मनसे कार्यकर्त्यांना संबोधीत करताना ठाकरे पुढे म्हणाले, सोशल मीडिया आपण कशा प्रकारे वापरला पाहिजे, राजकरणासाठी याचा कसा वापर केला पाहिजे, हे तपासा. सोशल मीडियाचा वापर लोकांपर्यंत पोहचण्यासाठी करा. राजकीयदृष्ट्या सोशल मीडियाचा वापर करा. प्रत्येक वर्षी पक्षाचा वर्धापनदिन वेगळ्या शहरात साजरा करणार. राजकारणात टिकायचं असेल तर संयम महत्वाचा आहे. मोदींचे यश दिसते आहे पण हे श्रेय त्यांच्या कार्यकर्त्यांचे आहे. २०१४ चं भाजपाचं यश इतकी वर्ष झटणाऱ्या कार्यकर्त्यांचे आहेत. अडवाणी, वाजपेयींनी खस्ता खालल्या म्हणून भाजपला यश मिळालं आहे. गेल्या १८ वर्षात मनसेने अनेक चढउतार पाहिले. जनतेनं कायम साथ दिली. आपल्याला यश मिळणार, मी मिळवून देणार. या पक्षात सर्वसामान्य तरुण आहेत. काहीवेळा तुमच्यासमोर वेगळं चित्र उभं केलं जातं.

महाराष्ट्रात जनसंघ, शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना हे खऱ्या अथार्ने पक्ष आहेत. तुमच्यातील अनेक लोक खासदार होतील, आमदार होतील या सगळ्यात तुमचा संयम महत्वाचा आहे. ९ एप्रिलला गुढीपाडव्याच्या दिवशी अनेक गोष्टी बोलणार आहे. अनेक विषयांवर बोलायचं आहे. लोक आता हात जोडून सांगत आहेत आता विश्वास



तुज्यावरच आहे. जनतेचा सरकारवरुन विश्वास उडाला आहे. भुलथापांना बळी पडू नका. महाराष्ट्र एकसंघ राहू नये यासाठी विष कालवलं जात आहे. कोण कोणाच्या पक्षात समजत नाही. राष्ट्रवादीतलं अजून सर्व एकत्र आहेत. माझं अजूनही ठाम मत आहे. मराठा आरक्षण होणार नाही हे मी जरांगेंना सांगितले होते. जे होणार नाही त्याबद्दल सरकार आश्वासन देत आहे. तुम्ही एकत्र यावं हे नेत्यांना नको आहे, असंही राज ठाकरे म्हणाले.

# पीएमपीच्या ताफ्यात लवकरच ५०० गाड्या

**पुणे, प्रतिनिधी :**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराची प्रमुख सार्वजनिक सेवा असलेल्या पीएमपीसाठी महापालिकेकडून विजेवर धावणाऱ्या ५०० गाड्यांची खरेदी करण्यात येणार आहे. त्यामुळे पीएमपीच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या वाढणार असून प्रवाशांना जलद सेवा मिळण्यास मदत होणार आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील किमान १० लाख प्रवाशांची पीएमपी ही प्रमुख सार्वजनिक सेवा आहे. त्या तुलनेत पीएमपीच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या अपुरी आहे. त्यामुळे ताफ्यातील गाड्यांची संख्या वाढविण्याची मागणी सातत्याने स्वयंसेवी संस्था, प्रवासी संस्थांकडून होत होती. ही बाब लक्षात घेऊन पुढील वर्षभरात नव्याने ५०० गाड्या खरेदी करण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे. पीएमपी प्रशासनाने गेल्या काही महिन्यांत काही गाड्यांची खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता.




त्याबाबतचा प्रस्ताव संचालक मंडळाच्या बैठकीतही मंजूर झाला असून, गाड्या खरेदीची प्रक्रिया प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. येत्या काही दिवसांत त्या संदभार्तील निविदा प्रक्रिया प्रसिद्ध होणार असून, १७७ गाड्यांची खरेदी पहिल्या टप्प्यात करण्यात येणार आहे. पीएमपीच्या ताफ्यात सध्या विजेवर धावणाऱ्या ४७३ गाड्या आहेत. येत्या काही दिवसांत १७७ गाड्या दाखल होणार असून त्यामुळे ही संख्या ६५० एवढी होणार आहे. त्यामध्ये नव्याने घोषणा केल्याप्रमाणे ५०० गाड्यांची भर पडणार आहे. प्रस्तावित ५०० गाड्यांमध्ये १०० गाड्या विजेवर धावणाऱ्या, तर ४०० गाड्या सीएनजीवरील असतील, असे महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी स्पष्ट केले.

रस्ते विकसनाबरोबरच सार्वजनिक वाहतुकीच्या सक्षमीकरणालाही महापालिकेने प्राधान्य दिले आहे. पीएमपीसाठी एकूण ४८२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच पीएमपीच्या सुतारवाडी आणि निगडी या आगारांमध्ये बांधा-वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्त्वावर आगारांचे व्यापारी विकसन करण्यात येणार आहे. त्यातून पीएमपीला उत्पन्न मिळण्यास मदत होणार आहे. तसेच विविध आगारांमध्ये आणि पीएमपीच्या स्वमालकीच्या मिळकतींवर ई-चार्जिंग स्टेशनही उभारण्याचे नियोजित आहे. त्यामुळे विजेवर धावणाऱ्या गाड्या ताफ्यात आल्यानंतर त्यांच्या चार्जिंगचीही सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होणार आहे.

# बंगळुरूतील कॅफे बॉम्बस्फोट प्रकरणातील दहशतवादी पुण्यात आल्याचा NIA ला संशय; तपास सुरू

**पुणे, अभिजित येरुल्लू:**

बंगळुरूतील रामेश्वरम कॅफेत झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणातील संशयित दहशतवादी पुण्यात आल्याचा संशय राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) व्यक्त केला आहे. बॉम्बस्फोट घडविल्यानंतर संशयित दहशतवादी बसने कर्नाटकातील बल्लारीपर्यंत गेला. त्यानंतर भटकल, गोकर्ण, बेळगाव, कोल्हापूरमार्गे तो पुण्यात पोहोचल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मात्र, संशयित दहशतवादी नक्की पुण्यात पोहोचला किंवा वाटेत त्याने बस बदलली का, याबाबत एनआयएच्या अधिकाऱ्यांनी दुजोरा दिला नाही. १ मार्च रोजी बंगळुरूतील रामेश्वरम कॅफेत बॉम्बस्फोट घडविण्यात आला. स्फोटकांनी भरलेली पिशवी ठेवून संशयित दहशतवादी तेथून पसार झाला. स्फोटानंतर तपास यंत्रणांनी रामेश्वरम कॅफेतील सीसीटीव्ही कॅमे-यांनी केलेले चित्रीकरण तपासासाठी ताब्यात घेतले. चित्रीकरणात संशयित दहशतवादी आढळून आला. चित्रीकरणाद्वारे संशयिताची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. बॉम्बस्फोट घडविल्यानंतर संशयित बंगळुरूतून बसने पसार झाला. बल्लारी स्थानकात तो बसमधून उत्तरल्याची माहिती एनआयएच्या पथकाला मिळाली. तेथील सीसीटीव्ही चित्रीकरण ताब्यात घेण्यात आले आहे. बल्लारी





स्थानकातून बस बदलून तो कर्नाटकातील होस्पेट, गोकर्णपर्यंत गेल्याचे आढळून आले आहे. तेथून तो बसने पुण्याकडे आल्याचा संशय एनआयएच्या पथकाला आहे.

कर्नाटकातील तपास यंत्रणांनी याबाबतची माहिती एनआयएच्या पुणे-मुंबईतील पथकांना दिली आहे. मात्र, संशयित दहशतवाद्याचा वावर नेमका कोठे आहे, हे निश्चित सांगता येत नाही. संशयित दहशतवादी नेमका कसा पसारा झाला. यादृष्टीने तपास सुरू आहे. बंगळुरूतील बसस्थानक, बल्लारी बसस्थानक, होस्पेट, भटकल, गोकर्ण या बसस्थानकातील सीसीटीव्ही चित्रीकरण मिळवण्यात येत असल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

# ठाकरे यांच्या भेटीनंतर श्री काळाराम मंदिराकडे राजकीय नेत्यांचा ओढा

**नाशिक, नितीन देवळेकर :**

अयोध्येतील राम मंदिरातील सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सहकुटुंब काळाराम मंदिरात महाआरती व रामकुंडावर गोदा पूजन केले होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मदिनी पक्षाचे राज्यव्यापी महाशिबीर व जाहीर सभेतून लोकसभा, विधानसभा निवडणुकीचे रणशिंग श्रीरामाच्या भूमीतून फुंकले होते. तेव्हापासून राजकीय पदाधिकाऱ्यांचा काळाराम मंदिरात दर्शनासाठी ओघ सुरू झाला. दोन महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख



उद्धव ठाकरे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मनसेचे राज ठाकरे आदी प्रमुख नेत्यांचा त्यात समावेश आहे. अयोध्येतील श्रीराम मंदिराचे लोकार्पण होण्याआधी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे राष्ट्रीय युवक महोत्सवाच्या निमित्ताने नाशिक दौऱ्यावर आले होते. शहरात रोड शो झाल्यानंतर त्यांनी पंचवटीतील श्री काळाराम मंदिरात महाआरती केली. काळाराम मंदिरात भेट देणारे मोदी हे पहिलेच पंतप्रधान ठरले. तेव्हापासून या मंदिराकडे राजकीय नेत्यांचा ओघ सुरू झाल्याचे मंदिर संस्थानाकडून सांगितले जाते. राजकीय नेत्यांच्या दौऱ्यांआधी महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस आणि तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनीही या मंदिरास भेट दिली आहे. खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील भारत जोडो न्याय यात्रा शहरात दाखल होत आहे. या दौऱ्यात ते त्र्यंबकेश्वर मंदिरात अभिषेक करणार आहेत. पंचवटीतील श्री काळाराम मंदिरास त्यांना भेट देण्याची इच्छा असल्याचे प्रदेश काँग्रेसच्या प्रवक्त्या डॉ. हेमलता पाटील यांनी सांगितले.

# १५७ कोटी रुपये दंड पश्चिम रेल्वेतून विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून केला वसूल



**मुंबई, दिगंबर जाधव :**

पश्चिम रेल्वे प्रशासनाने लोकल, वातानुकूलित लोकल, लांबपल्ल्याच्या रेल्वेगाड्यामधून विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांची धरपकड सुरू केली आहे. पश्चिम रेल्वेवर एप्रिल २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या काळात सुमारे २५ लाख विनातिकीट प्रवाशांची धरपकड करण्यात आली असून त्यांच्याकडून १५७ कोटी रुपये दंड वसूल करण्यात आला. लोकलमध्ये विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांची गर्दी वाढल्याने तिकीटधारक प्रवाशांची गैरसोय होत आहे. त्यामुळे पश्चिम रेल्वेकडून प्रत्येक स्थानकात दररोज तिकीट तपासणी करण्यात येत आहे. तसेच अनेक मोहिमा राबवून विनातिकीट प्रवाशांना पकडण्यात येत आहे. या मोहिमेत सुमारे २५ लाख विनातिकीट प्रवाशांना पकडण्यात आले. फेब्रुवारी २०२४ मध्ये आरक्षित न केलेल्या सामानासह विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर कारवाई करून १५.६२ कोटी रुपये दंड वसूल करण्यात आला. याच कालावधीत पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल विभागात एक लाख दोन हजार विनातिकीट प्रवाशांना पकडून त्यांच्याकडून सुमारे ४.५५ कोटी रुपये दंड वसूल करण्यात आला.

# मध्य, पश्चिम आणि कोकण रेल्वेच्या होळी विशेष रेल्वेगाड्या

**मुंबई, विशाल कारंडे :**

मध्य, पश्चिम आणि कोकण रेल्वेने होळी विशेष रेल्वेगाड्या चालवण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे प्रवाशांची गर्दी विभाजित करण्यास मदत होईल. अहमदाबाद - मडगाव, एलटीटी - थिवी, पनवेल -सावंतवाडी, उधना - मंगळुरू, सुरत - करमळी होळी विशेष रेल्वेगाड्या चालवण्यात येणार आहेत. त्यामुळे होळीनिमित्त कोकणात जाणाऱ्यांना दिलासा मिळू शकेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. कोकण रेल्वे मार्गे धावणाऱ्या अहमदाबाद - मडगाव होळी विशेष गाड्या १९ मार्च २०२४ पासून चालविण्यात येणार आहेत. गाडी क्रमांक ०९४१२ अहमदाबाद - मडगाव (वसई रोडमार्गे) होळी विशेष रेल्वेगाडी १९ आणि २६ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता सुटेल. तर, मडगावला दुसऱ्या दिवशी पहाटे ५.३० वाजता पोहचेल. गाडी क्रमांक ०९४११ मडगाव - अहमदाबाद होळी विशेष रेल्वेगाडी २० आणि २७ मार्च रोजी सकाळी ८ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी अहमदाबादला सकाळी ७ वाजता पोहोचेल. या रेल्वेगाडीला वडोदरा, सुरत, वलसाड, वापी, पालघर, वसई रोड,



पनवेल, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डे, संगमेश्वर, रत्नागिरी, आडवली, राजापूर, वैभववाडी, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी, थिवी आणि करमळी येथे थांबे देण्यात येतील. या दोन्ही रेल्वेगाड्यांचे आरक्षण सुरू झाले आहे. गाडी क्रमांक ०११८७ एलटीटी - थिवि विशेष रेल्वेगाडी १४, २१ आणि २८ मार्च रोजी रात्री १०.१५ वाजता सुटेल. तर, गाडी क्रमांक ०११८८ थिवी - एलटीटी विशेष रेल्वेगाडी १५, २२, २९ मार्च रोजी दुपारी ४.३५ वाजता सुटेल. ही गाडी ठाणे, पनवेल, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ आणि सावंतवाडी रोड स्थानकावर थांबेल.गाडी क्रमांक ०१४४४ सावंतवाडी रोड - पनवेल विशेष (साप्ताहिक) १२, १९ आणि २६ मार्च रोजी सावंतवाडी रोडवरून रात्री ११.२५ वाजता सुटेल. गाडी क्रमांक ०१४४३ पनवेल - सावंतवाडी रोड विशेष (साप्ताहिक) पनवेल येथून १३, २० आणि २७ मार्च रोजी सकाळी ९.४० वाजता सुटेल. ही गाडी कुडाळ, सिंधुदुर्ग, कणकवली, राजापूर रोड, रत्नागिरी, संगमेश्वर रोड, चिपळूण, खेड आणि रोहा या स्थानकांवर गाडी थांबेल.गाडी क्रमांक ०९०५७ उधना - मंगळुरू होळी विशेष रेल्वेगाडी २० आणि २४ मार्च रोजी रात्री ८ वाजता सुटेल.

# १७ मार्चला शिवाजी पार्कवर भारत जोडो न्याय यात्रेची जाहीर सभा, सभेला सरकारची परवानगी



**मुंबई, सचिन कदम :**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या ह्यभारत जोडो न्याय यात्रेह्णची रविवारी १७ मार्चला मुंबईत शिवाजी पार्कवर जाहीर सभेने सांगता होणार आहे. त्यावेळी इंडिया आघाडीचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. या सांगता सभेतच लोकसभा निवडणूक प्रचाराचे बिगुल फुंकले जाणार आहे. त्यादृष्टीने प्रदेश काँग्रेसने जोरदार तयारी सुरू केली आहे. खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील भारत जोडो न्याय यात्रा १२ मार्चला नंदूरबार येथून महाराष्ट्रात प्रवेश करेल व १७ मार्चला मुंबईत समारोप होणार आहे. मुंबईतील शिवाजी पार्कवर न्याय यात्रेची सांगता सभा होणार आहे, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली. भारत जोडो न्याय यात्रेच्या तयारीसाठी राज्याचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक पार पडली. राहुल गांधी यांचे नंदुरबार ते मुंबई या प्रवासात अनेक कार्यक्रम होतील व त्यासाठी त्या-त्या भागातील नेत्यांना जबाबदाऱ्या दिल्या आहेत. शिवाजी पार्कवर सभा घेण्यासाठी परवानगी मागितली होती व ती मिळाली आहे. भारत जोडो न्याय यात्रा छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या भूमीत येत आहे. या महापुरुषांच्या विचारांना संपवण्याचे काम केंद्रातील व राज्यातील भाजप सरकार करत आहे. लोकशाही व भाजप संविधान संपवायला निघाले आहे परंतु त्यांना जशास तसे उत्तर देण्याची आमची तयारी आहे, असे पटोले यांनी म्हटले आहे. शिवाजी पार्कवर सभेसाठी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने परवानगी दिली आहे. राहुल गांधी यांच्या सभांना काही राज्यांमध्ये परवानगी नाकारण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर शिवाजी पार्कच्या सभेसाठी लवकर परवानगी मिळण्याबाबत काँग्रेस नेते साशंक होते. पण सरकारने परवानगी दिली आहे.

# कोस्टल रोडच्या लोकार्पणाचा घोळ संपला; मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सोमवारी होणार उद्घाटन

**मुंबई, विशाल पाटील :**

डिलाईलरोड पूल आणि गोखले पूल या दोन्ही पुलांच्या उद्घाटनाचा घोळ ताजा असताना कोस्टल रोडच्या लोकार्पणाचा नवा घोळ झाला होता. अखेर सोमवार, दि. ११ मार्च रोजी त्याचे लोकार्पण करण्याचे अखेर निश्चित झाले आहे कोस्टल रोडची एक मार्गिका शनिवारपासून सुरू केली जाणार होती, त्यासाठी निमंत्रण पत्रिकेचा मसुदाही तयार करण्यात आला होता.

मात्र आता सोमवारी लोकार्पण होईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. पंतप्रधानांच्या हस्ते फेब्रुवारीत एका मार्गिकेचे लोकार्पण करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न होता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत कोस्टलची एक मार्गिका सुरू केली जाणार आहे. लोकार्पणाच्या कार्यक्रमासाठी



स्थानिक खासदार अरविंद सावंत, स्थानिक आमदार आदित्य ठाकरे आणि सुनील शिंदे यांचीही नावे निमंत्रण पत्रिकेवर आहेत. काळात विविध प्रकल्पांचे भूमिपूजन लोकार्पण यासाठी पंतप्रधान नवी मुंबईत आले होते. या भेटींच्या निमित्ताने कोस्टलचे उद्घाटन करण्याचा प्रयत्न होता.

मात्र तोपर्यंत काम पूर्ण झाले नसल्याने बेत बारगळला. त्यानंतरही लोकार्पणाविषयी प्रशासनाकडून ठोस सांगण्यात येत नव्हते. तारखेची अनौपचारिक घोषणा व्हायची, पण तिही हवेत विरून जायची. या पार्श्वभूमीवर या आठवड्यात पुन्हा एकदा कोस्टलची चार्चा सुरू झाली, शनिवारी संध्याकाळी ४ वाजता मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण होईल, असे सांगण्यात आले, निमंत्रणपत्रिकेचा मसुदाही तयार करण्यात आला. मात्र शनिवारी लोकार्पण होणार नाही, हे पालिकेकडून शुक्रवारी स्पष्ट झाले, याआधी डिलाईल रोड आणि गोखले पुलाच्या उद्घाटनाचा असाच घोळ घालण्यात आला होता. गोखले पुलाचे काम झाले असतानाही मुख्यमंत्र्यांना वेळ नाही, म्हणून उद्घाटन पुढे ढकलले जात होते, काम अपुरे आहे, असे भासवण्यासाठी पुलावर मुद्दाम राडारोडा ठेवण्यात आला आहे, असा आरोप झाला होता.

# कल्याण-डोंबिवलीत मंगळवारी पाणीकपात

**डोंबिवली, रोहित जैसवाल :** टाटा पॉवर कांबा सबस्टेशनमधील फिडरच्या देखभाल-दुरुस्तीचे काम मंगळवारी करण्यात येणार आहे. यासोबतच बारावे, मोहिली, नेतिवली व टिटवाळ जलशुद्धीकरण केंद्रातील विद्युत व यांत्रिकी उपकरणांच्या देखभाल-दुरुस्तीचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे मंगळवारी शटडाऊन घेण्यात येणार असून ९ तासांसाठी पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत कल्याण-डोंबिवलीचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या १५० दक्षलक्ष लिटर



मोहिली उदंचन केंद्र (नेतिवली ज.शु.के.) व १०० दक्षलक्ष लिटर मोहिली जलशुद्धीकरण केंद्राला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडमार्फत टाटा पॉवर कांबा सबस्टेशन येथून विद्युत पुरवठा केला जातो. टाटा पॉवर कांबा सबस्टेशनमधील एनआरसी दोन फिडरच्या देखभाल व दुरुस्तीचे काम मंगळवारी केले जाणार आहे. यानिमित्ताने १२ मार्चला शटडाऊन घेण्यात येणार असल्याबाबत टाटा पॉवर कंपनीचे ग्रुप हेड कल्याण नोड यांनी कळवले आहे. तसेच या दिवशी बारावे, मोहिली, नेतिवली व टिटवाळा जलशुद्धीकरण केंद्रातील विद्युत व यांत्रिकी उपकरणांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी बारावे, मोहिली, नेतिवली व टिटवाळा जलशुद्धीकरण केंद्रामधून कल्याण (पूर्व व पश्चिम), कल्याण ग्रामिण विभाग (मांडा-टिटवाळा, वडवली, आंबिवली, शहाड, अटाळी व कल्याण ग्रामीण विभागातील इतर गावे) व डोंबिवली (पूर्व व पश्चिम) परिसराला होणार पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

# ठाणे वाहतूक कोंडीमुक्तीसाठी साडेसहा हजार कोटींचे तीन प्रकल्प; निविदा प्रसिद्ध; ‘एमएमआरडीए’कडून सल्लागार नियुक्ती

**मुंबई, प्रतिनिधी,**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यात विकासकामांचा धडका लावला आहे. ठाणातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी एमएमआरडीएने आता साडेसहा हजार कोटींहून अधिक खर्चाच्या प्रकल्पांच्या कामास सुरुवात करण्याचा निर्णय घेतला आहे. तीन महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या बांधकामासाठी निविदा प्रसिद्ध केल्या आहेत. बाळकूम ते गायमुख खाडी किनारा मार्ग, पूर्वमुक्त मागार्चे घाटकोपर ते ठाणे विस्तारीकरण आणि कासारवडवली ते खारबांव खाडीपूल असे हे तीन प्रकल्प आहेत. तर या प्रकल्पांच्या व्यवस्थापनासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याकरिताही निविदा प्रसिद्ध केली आहे. ठाण्यातील




वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी १३.१४ किमी लांबीचा बाळकुम ते गायमुख ठाणे खाडी किनारा मार्ग बांधण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे. सहा मार्गिकांचा आणि ४०-४५ मीटर रुंदी असलेला हा खाडी किनारा मार्ग बाळकुमजवळील खारेगाव येथून सुरू होऊन घोडबंदर रस्त्यावरील गायमुख येथे संपणार आहे. बाळकुम, कोलशेत, वाघबीळ, ओवळा, कासारवडवली, मोघरपाडा येथून सागरी मार्ग जाईल.

# पोटाच्या कर्करोगासाठी द्राक्षे लाभदायक

**द्राक्षांमधील संयुगे पोटाच्या कर्करोगावर प्रभावी असल्याचे एका संशोधनातून स्पष्ट झाले आहे. कर्करोगानंतर शरीरातील मृत पेशी रोखण्यात द्राक्षे महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे संशोधकांनी स्पष्ट केले आहे.**

कर्करोगाच्या मूळ पेशी या स्वयंनिर्मित असतात. त्या विविध प्रकारे शरीरातील पेशींवर हल्ला करतात आणि स्वयंनिर्मित पेशींची संख्या वाढवतात, असे संशोधकांनी सांगितले. त्यामुळे कर्करोग रोखण्यासाठी या मूळ पेशींना लक्ष्य करण्यावर आमचा भर आहे. या मूळ पेशींना रोखल्यास कर्करोगाला रोखण्यात मदत होते, असे अमेरिकेतील पेनसिल्व्हानिया राज्य विद्यापीठातील सहाय्यक प्राध्यापक जयराम के. पी. वनमाला यांनी स्पष्ट केले. पोटातील कर्करोगावर प्रभावी ठरणारे



रिझर्व्हरॅट्रोल हे संयुग द्राक्षांमध्ये आढळते. त्यामुळे पोटाचा कर्करोग असलेल्या रुग्णांनी द्राक्षांचे सेवन करावे, असे वनमाला यांनी सांगितले. पोटातील कर्करोगाच्या पेशी नष्ट करण्यात रिझर्व्हरॅट्रोल हे संयुग मोलाची भूमिका बजावत असून ते आरोग्यदायी असल्याचेही वनमाला यांनी स्पष्ट केले. रिझर्व्हरॅट्रोल या संयुगाचा स्वतंत्र डोस कमी प्रमाणात घेतल्यास तो पोटाच्या कर्करोगावर तितकासा प्रभावी ठरत नाही.

द्राक्षांद्वारे हे संयुग पोटात गेल्यावरच त्याचा सकारात्मक परिणाम होत असल्याचेही संशोधकांनी सांगितले. पोटाचा कर्करोग असलेल्या ५२ उंदरांवर हे संशोधन करण्यात आले. हे संशोधन बीएमसी मासिकात प्रसिद्ध झाले आहे.

# डिजिटल मेकअपने खुलवा तुमचं सौंदर्य


**मेकअप हा शब्द आता सर्वपरिचित झाला आहे. काळानुरूप मेकअप करण्याच्या पद्धतीतही बदल झाला आहे. पूर्वी लग्नकार्य किंवा एखाद्या पार्टीमध्ये जाण्यासाठी मेकअप करण्यात येत होता. मात्र आपल्या कामाबरोबरच स्वतःला प्रेझेंट करणे ही काळाची गरज झाली आहे. तुमच्या राहण्याला आणि दिसण्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे आता तरुणी, स्त्रिया सर्रास मेकअप करताना दिसतात. मेकअप करण्याच्याही वेगवेगळ्या पद्धती असून सध्या डिजिटल मेकअपला महिला वर्गातून पसंती मिळत आहे. विशेष म्हणजे उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये या मेकअपला सर्वाधिक प्राधान्य असल्याचं पाहायला मिळत आहे. चला तर मग जाणून घेऊयात डिजिटल मेकअपविषयी.**

## डिजिटल मेकअप म्हणजे काय?

पार्टी, लग्न-कार्य किंवा एखाद्या कार्यक्रमामध्ये परफेक्ट लूक देणारा मेकअप म्हणून याच्याकडे पाहिलं जातं. या मेकअपचं वैशिष्ट्य म्हणजे हा मेकअप केल्यानंतर फोटो काढल्यास आपलं सौंदर्य खुलून दिसतं. अनेक वेळा मेकअप करून फोटो काढल्यानंतर फोटोमध्ये चेहऱ्यावर काही ठिकाणी मेकअपमुळे आलेले पांढरे पॅच किंवा मेकअप भडक रंगाचा दिसतो. मात्र हा मेकअप केल्यानंतर चेहऱ्यावर कोणतेही पॅच किंवा मेकअपची मात्रा गडद दिसत नाही. उलट मेकअप केल्यानंतर प्रत्यक्षात जो चेहरा दिसतो. अगदी तसाच चेहरा फोटोमध्येही दिसतो. त्याप्रमाणेच हा मेकअप केल्यामुळे वारंवार टचअप करण्याची देखील

## मेकअप करताना 'या' गोष्टी कायम लक्षात ठेवा!

▶ डिजिटल मेकअप कायम प्रोफेशनल मेकअप आर्टिस्टकडूनच करून घ्यावा. ▶ मेकअप कधीही गडद नसावा. शक्यतो सौम्य मेकअप करावा. त्यामुळे सौंदर्यात अधिक भर पडते.
▶ डिजिटल मेकअपमध्ये डोळे, ओठ यांच्यावर शक्यतो गडद रंगाच्या शेड्स वापराव्यात.



## सिलिकाचा वापर

डिजिटल मेकअप हा सामान्य मेकअपप्रमाणेच केला जातो. मात्र यामध्ये सिलिकाचा वापर केलेला असतो. सिलिकामुळे हा मेकअप आपल्या चेहऱ्यावर योग्य प्रकारे बसतो. त्यासोबतच या मेकअपमुळे चेहऱ्यावर नैसर्गिक शाइन किंवा चमक येते. डिजिटल मेकअपमध्ये वापरण्यात येणाऱ्या मेकअप बेस, पावडर, ब्लशर आणि आयशेड्समध्ये सिलिकाची मात्रा असते.



## वॉटर प्रूफला सर्वाधिक पसंती

सामान्यतः उन्हाळ्यात मेकअप केल्यानंतर घाम किंवा पाण्यामुळे चेहऱ्यावरील मेकअप उतरतो. मेकअप खराब झाल्यामुळे सौंदर्यामध्ये बाधा येते. मात्र डिजिटल मेकअप वॉटरप्रूफ असून तो २४ तास चेहऱ्यावर टिकून राहतो. त्यामुळे तुमच्या सौंदर्यामध्ये कोणतीही बाधा येत नाही.

# अनियमित गर्भपाताचे वाढते प्रमाण... काय आहेत कारणे



**देशात** गर्भपाताच्या संख्येत झपाट्याने वाढ होताना दिसत आहे. या प्रकरणावर डॉक्टर चिंता व्यक्त करत आहेत. त्याचे मुख्य कारण आहे, असुरक्षित गर्भपात. ज्यामुळे महिलांच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणावर असतो. पद्मश्री डॉ. के.के. अग्रवाल यांच्या माहितीनुसार, देशामध्ये असुरक्षित गर्भपात स्त्रियांच्या अकाली मृत्यूचे मुख्य कारण आहे. डॉ. के. के. अग्रवाल यांच्या माहितीनुसार, 'गर्भपातावर प्रतिबंध लावण्यासाठी महिलांना गर्भावस्था करण्यापासून थांबावता येत नाही. त्यामुळे गर्भ समाप्त करण्यासाठी अनेक उपायांची मदत घेतली जाते आणि हे उपाय महिलांच्या आरोग्यास घातकही ठरू शकतात.' देशाच्या अनेक भागांमध्ये गर्भनिरोधकावर योग्य औषधे उपलब्ध नाहीत. त्यामुळे अनियोजित गर्भावस्थेच्या दरात वाढ होताना दिसत आहे. असे वक्तव्य हार्ट केअर फाऊंडेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. के. के. अग्रवाल यांनी केले आहे.

## असुरक्षित गर्भपात

गर्भपातावर वापरण्यात येणारी औषधे प्रभावी आणि सुरक्षित असायला हवीत. त्याचप्रमाणे औषधांचा वापर कशाप्रकारे करावा याची पूर्णतः माहिती असायला हवी. त्यामुळे ही औषधे महिलांच्या जीवावर बेतू शकत नाहीत.

## गर्भनिरोधक व गर्भपात

गर्भनिरोधक आणि गर्भपात या दोन विषयांवर प्रशिक्षण देणे फार महत्वाचे आहे. परिस्थितीचा आढावा घेणे, सुरक्षित गर्भपात करणे, वास्तविकता निर्माण करणे आणि देशभरात योग्य सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. सर्व भागातील महिलांना योग्य माहिती उपलब्ध आहे याची खात्री करणे देखील आवश्यक आहे.

# मध सेवन करा, निरोगी राहा!

**तुम्ही** आजाराने वैतागला असाल तर घाबरून जाऊ नका. कारण आता मधानेदेखील त्यावर उपचार करू शकता. घरगुती उपायांमध्ये मधाचा नेहमी उल्लेख होत असतो. गुणांसह मिठासपणा कोणत्या पदार्थात आढळत असेल तर तो आहे मध. तसे पाहिले तर मध प्रत्येक मोसमात लाभदायक असतो. मात्र उन्हाळ्यात तो जास्त उपयुक्त ठरतो. रोगप्रतिकारक गुणांमुळे मध आरोग्यास मदत तर करतोच, पण त्याचबरोबर रूप-रंग उजळण्यातही उपयोगी आहे. अलीकडेच जर्मनीत झालेल्या एका अभ्यासानुसार मधात आढळणारा अँटी ऑक्सिडंट घटक शरीरच्या पेशी क्षीण होण्यापासून रक्षण करतो. बहुधा त्यामुळेच जुन्या काळात लोक भरपूर प्रमाणात मध सेवन करीत असत. आजही अरब देशांतील लोक आपल्याला निरोगी ठेवण्यासाठी नियमितपणे मध सेवन करतात. मधात मोठ्या प्रमाणात कॅलरी आढळतात. आरोग्यासाठी त्या खूप गुणकारी मानल्या जातात.




# कपडेच करतील आजारपणापासून बचाव



**व्यक्तीचे** कपडे त्याच्या वक्तिमत्त्वाचा आरसा ठरतो. विविध प्रकाराचे पोशाख व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व पूर्णतः बदलवून टाकतात. व्यक्तिमत्त्व खुलवणारे काही पोशाख सौंदर्यास भलेही खुलवत असतील, पण बऱ्याचदा शरीरासाठी आरामदायी नसतात. याउलट काही कपडे अतिशय कम्फर्टेबल असतात. वेगवेगळ्या पोशाखांत मिळणारा हा अनुभव सगळेच जाणून असतील, पण आपले कपडे आजारपण देऊ शकतात व काही वेळा आजारपणातून सुटकाही करू शकतात, हे फार थोड्या जणांना ठाऊक असेल.

कपड्यांमध्येसुद्धा ही ताकद असते. असेही म्हटले जाते की हृदयविकार, मधुमेह, त्वचेचे आजार, उच्च रक्तदाब यांसारख्या आजच्या आधुनिक काळात वेगाने पसरत असलेल्या आजारांशी लढण्यासाठी कपडेच मदत करू शकतात. हा काही एखादा नवीन शोध नाही तर वैदिक काळापासूनचा अनुभव आहे.

पाच हजार वर्षांपूर्वी प्राचीन भारतीयांनी अशी वस्त्रे तयार केली होती. ही वस्त्रे केवळ शरीरासाठी आरामदायची नव्हती तर विवधि आजारांशी मुकाबला करण्यातही मदत करत. त्याकाळचे कपडे आजच्या सारखे रसायनांचा वापर करून तयार केले जात नव्हते. या कपड्यांचे हे महत्त्व लक्षात घेऊन आजकालचे काही फॅशन डिझायनरही वैदिक पद्धतीने कपडे तयार करू लागले आहेत.

हे कपडेही आजारपणातून बचाव करण्याची तेवढीच क्षमा ठेवून आहेत. हे कपडे तयार करताना विविध औषधांचा प्रयोग केला जातो. त्यासाठी खास आदिवासी भागांतून आयुर्वेदिक औषधे मागवली जातात.

# अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ चेहरा लपवत आले माध्यमांसमोर

बॉलीवूडचा सुपरस्टार अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ यांचा आगामी चित्रपट बडे मियाँ छोटे मियाँ ईदच्या मुहूर्तावर प्रदर्शित होणार आहे. दोन्ही स्टार्स वेगवेगळ्या शहरांत जाऊन या चित्रपटाचे दणक्यात प्रमोशन करताना दिसतायत. अनेकदा माध्यमांसमोर येताना आपण अक्षय आणि टायगरला वेगवेगळ्या रूपांत पाहिलंच असेल; पण आज दोघंही माध्यमांसमोर येताना आपला चेहरा लपवत आले होते. या दोघांचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. बडे मियाँ अक्षय कुमार आणि छोटे मियाँ टायगर श्रॉफचा एक व्हिडीओ समोर आला आहे. त्यात अक्षय आणि टायगरने पापाराझींसमोर येताच आपला चेहरा झाकला आणि लपत लपत ते माध्यमांसमोर आले. अक्षय आणि टायगरच्या अशा वागण्यामुळे सगळेच गोंधळात पडले. अशातच एकानं विचारलं, नक्की काय झालं सर? तेवढ्यात दुसरा पापाराझी म्हणाला, हा नक्कीच ट्रेंड आहे. त्यानंतर हसत हसत अक्षय आणि टायगरनं एकमेकांना मिठी मारली. अशा प्रकारे दोघांनी पापाराझींबरोबर प्रँक केला, असं लक्षात आलं. व्हायरल झालेल्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत, खिलाडीशिवाय अशी मस्करी कोणीच करू शकत नाही. अशी कमेंट एकानं केली. तर, काही जण म्हणाले, चेहरा लपवावा लागेल, असं कामच का करायचं? दरम्यान, अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ अभिनीत बडे मियाँ छोटे मियाँ चित्रपट १२ मार्च रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या ॲक्शन थ्रिलर चित्रपटात अक्षय आणि टायगरबरोबरच पृथ्वीराज सुकुमारन, सोनाक्षी सिन्हा, मानुषी छिल्लर, अलाया फर्निचरवाला, रोनित रॉय यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.



## दै. लोकरक्षणाय सुडोकू - २८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 4 | 6 | | | 8 | | 1 | |
| 3 | | | | 9 | | | | 2 |
| | 9 | | | | 4 | 6 | | 8 |
| 4 | | 9 | 1 | 2 | 3 | | | |
| | 6 | | | | | 8 | | |
| 1 | | 7 | | | 6 | | | 4 |
| 6 | 7 | | | | | 9 | | |
| | 1 | 3 | 9 | | | | | 7 |
| | | | 3 | 4 | | | | |

## उत्तर सुडोकू -२७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 1 | 3 | 9 | 2 | 5 | 6 | 8 | 7 |
| 2 | 7 | 8 | 6 | 1 | 3 | 5 | 9 | 4 |
| 6 | 9 | 5 | 4 | 7 | 8 | 1 | 2 | 3 |
| 8 | 5 | 1 | 3 | 9 | 2 | 7 | 4 | 6 |
| 9 | 2 | 6 | 7 | 4 | 1 | 8 | 3 | 5 |
| 7 | 3 | 4 | 8 | 5 | 6 | 9 | 1 | 2 |
| 1 | 4 | 7 | 2 | 6 | 9 | 3 | 5 | 8 |
| 3 | 6 | 9 | 5 | 8 | 4 | 2 | 7 | 1 |
| 5 | 8 | 2 | 1 | 3 | 7 | 4 | 6 | 9 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# हिरवा चुडा, मेहेंदीने रंगलेले हात पूजा सावंतने शेअर केले हनिमूनचे फोटो; म्हणाली, 'अजूनही..'

कलरफुल म्हणून ओळखली जाणारी मराठी सिनेसृष्टीतील अभिनेत्री पूजा सावंत आणि सिद्धेश चव्हाण यांचा लग्नसोहळा २८ फेब्रुवारी २०२४ रोजी थाटामाटात पार पडला. लग्नानंतर विधिपूर्वक सत्यनारायणाची पूजा आणि मग सिद्धिविनायकाचं दर्शन घेत दोघांनी आपल्या नव्या आयुष्याची सुरुवात केली. नुकतेच दोघंही हनिमूनला जाताना मुंबई विमानतळावर दिसले होते. पूजाची बहिण रुचिरा या जोडप्याला सोडायला गेली होती. नववधू पूजाने तिच्या हनिमूनचे फोटो इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केले आहेत. या फोटोमध्ये पूजाने सफेद रंगाचा चिकनकारी कुर्ता घातला आहे. मोकळे केस, हातात हिरवा चुडा व नो मेकअप लूकमध्ये पूजाचं सौंदर्य खुलून दिसत आहे. दुसऱ्या फोटोमध्ये पूजाने मेंदीनं रंगलेल्या तिच्या हातांचा फोटो शेअर केला आहे. १३ दिवसांनंतरही पूजाच्या मेंदीचा रंग तितकाच उठून दिसतो आहे. या फोटोला कॅप्शन देत पूजाने लिहिलं, अजूनही मेंदी हातावर आहे आणि हे किती सुंदर आहे पूजा सावंतची बहीण रुचिरा ही तिच्या बहिणीच्या साखरपुड्यापासून ते लग्नापर्यंत सगळीकडे आपली जबाबदारी पार पाडताना दिसली. आपल्या बहिणीला आणि भावोजींना विमानतळावर सोडायलाही रुचिरा गेली होती. पूजाच्या लग्नानंतर रुचिराला तिची खूप आठवण येत असते आणि तिच्या पोस्टद्वारे ती तिच्या भावना व्यक्त करताना दिसते. आता पुन्हा एकदा रुचिराने एक स्टोरी शेअर केली आहे. ज्यात डोरेमॉन कार्टूनचा व्हिडीओ शेअर करीत त्यावर आय मिस यू अशी कॅप्शन रुचिरानं दिली आहे आणि पूजाला टॅग केलं आहे. हा व्हिडीओ रिपोस्ट करीत पूजानं आय मिस यू टू रुचू. आलेच अशी कॅप्शन दिली आहे. पूजा आणि रुचिरा या दोन्ही बहिणींचं नात खूप घट्ट असल्याचं या स्टोरीवरून कळतंय.



## दिनविशेष

**१० मार्च**

- १८६२: अमेरिकेत कागदी चलन नोटांची सुरवात झाली.
- १८७३: अलेक्झांडर ग्राहम बेल यांनी त्यांचा सहकारी थॉमस वॅटसन यांच्याशी दुरध्वनी वरून पहिल्यांदा संवाद साधला.
- १९२२: प्रक्षोभक भाषण केल्याबद्दल महात्मा गांधींना ६ वर्षांची शिक्षा झाली.
- १९५२: केंद्रीय मंत्री काकासाहेब गाडगीळ यांच्या हस्ते पिंपरी येथील हिंदुस्थान अँटिबायोटिक्स या पेनिसिलीन कारखान्याचा पायाभरणी समारंभ झाला.
- १९७२: वेलकम थिएटर निर्मित, विजय तेंडुलकर लिखित व कमलाकर सारंग दिग्दर्शित सखाराम बाईंडर या नाटकाचा पहिला प्रयोग दादर येथील शिवाजी मंदिर येथे झाला.
- १९७७: युरेनस ग्रहाला शनी ग्रहासारखी कडी असल्याचा शोध लागला.
- १९८५: भारताने पाकिस्तानला पराभूत करून मेलबोर्न येथे बेन्सन ॲण्ड हेजेस चॅम्पियनशिप हि क्रिकेट स्पर्धा जिकली.
- १९८५: भारतीय क्रिकेट संघाने रवि शास्त्री यांना चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स हा किताब मिळाला.
- १९९८: भारतीय बुध्दीबळपटू विश्वनाथन आनंद यांनी लिनारेस सुपर ग्रँडमास्टर बुध्दिबळ स्पर्धा जिंकली.
- १६२८: इटालियन डॉक्टर मार्सेलिओ माल्पिघी लादेन यांचा जन्म. (मृत्यू: ३० सप्टेंबर १६९४)
- १९१८: गायक आणि अभिनेता सौदागर नागनाथ गोरे उर्फ छोटा गंधर्व यांचा जन्म. (मृत्यू: ३१ डिसेंबर १९९७)
- १९२९: कवी मंगेश पाडगावकर यांचा जन्म.
- १९४५: केंद्रीय रेल्वे मंत्री माधवराव शिवाजीराव शिंदे यांचा जन्म. (मृत्यू: ३० सप्टेंबर २००१ झ मैनपुरी, उत्तर प्रदेश)
- १९५७: अल कायदा या आतंकी संस्थेचे संस्थापक ओसामा बिन लादेन यांचा जन्म. (मृत्यू: २ मे २०११)
- १९७४: ट्विटर चे सहसंस्थापक बिझ स्टोन यांचा जन्म.
- १८७२: इटालियन स्वातंत्र्यवीर जोसेफ मॅझिनी यांचे निधन. (जन्मः २२ जून १८०५)
- १८९७: पहिल्या महिला शिक्षिका आणि समाज सुधारक सावित्रीबाई फुले यांचे निधन. (जन्मः ३ जानेवारी १८३१)

## भविष्य

**मेष** नटण्याची हौस पूर्ण कराल. तुमचे व्यक्तिमत्व प्रभावी ठरेल. आनंदी दृष्टीकोन ठेवाल. प्रेमाच्या दृष्टीने नवीन मैत्री लाभेल.

**वृषभ** प्रवासात आरोग्याची काळजी घ्यावी. कामात चंचलता आड येऊ शकते. भावंडांची बाजू जाणून घ्यावी. टीकेकडे दुर्लक्ष करावे.

**मिथुन** मुलांच्या वेगळ्या खचार्चे नियोजन करावे. घेतलेल्या ज्ञानाचा योग्य उपयोग होईल. काहीसे छांदीष्टपणे वागाल.

**कर्क** उत्तम वाहन सौख्य लाभेल. घरातील ज्येष्ठांची मदत होईल. मनाचा सज्जनपणा दाखवाल. हसत खेळत सर्व गोष्टी पार पडाल. सजावटीच्या वस्तु खरेदी कराल.

**सिंह** दूरच्या प्रवासाचा योग येईल. मनातील निराशा बाजूस सारावी. चंचलतेत वाढ होऊ शकते. जवळचे मित्र भेटतील. भावंडांच्या समस्या समजून घ्याल.

**कन्या** जुन्या कामातून लाभ होईल. पैशाचा सदुपयोग कराल. खाण्या पिण्याबाबत चोखंदळ राहाल. मौल्यवान वस्तूंची आवड दर्शवाल. व्यावसायिक लाभ उत्तम होईल.

**तुला** आपले कर्तव्य योग्य रीतीने बजावाल. आपले मत इतरांना मान्य करायला लावाल. प्रशासकीय भूमिका घ्याल. कामाचा उरक वाढेल. चिकाटीने कामे कराल.

**वृश्चिक** आध्यात्मिक उन्नती साधण्याचा प्रयत्न कराल. ऐहिक गोष्टींची कामना करू नये. मनात नसतानाही प्रवास करावा लागेल. ढोंगी लोकांविषयी तिटकारा दाखवाल. ठाम निर्णयावर भर द्यावा.

**धनु** अचानक धनलाभ संभवतो. मित्रांशी मतभेद संभवतात. योग्य संधीसाठी वाट पहावी लागेल. मनातील इच्छा पूर्ण होईल. भडकपणे मत मांडू नका. करमणुकीसाठी अधिक वेळ घालवाल.

**मकर** जोडीदाराची कर्तबगारी दिसून येईल. शांत संयमी विचार कराल. कामात पत्नीचा हातभार लाभेल. जबाबदारीने कामे उरकाल. चार-चौघांत कौतुक केले जाईल. प्रकृतीची किरकोळ तक्रार जाणवेल.

**कुंभ** अधिकारी व्यक्तींचे मार्गदर्शन घ्यावे. कामातील दिरंगाई टाळावी. श्रद्धेची बाजू लक्षात घ्यावी. वडीलांच्या मताचा आदर करावा. इतरांना आनंदाने मदत कराल.

**मीन** मुलांचा उडणारा गोंधळ दूर करावा. सतत काळजी करत बसू नये. रेस जुगारातून लाभ संभवतो. भावनेच्या भरात वाहवून जाऊ नये. आवडीचे पदार्थ खायला मिळतील.


Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# टायगर की टूरिस्ट?

अभयारण्ये किंवा राष्ट्रीय वने निर्माण करण्यामागचा हेतू वन्यजीवांचे संरक्षण आणि संवर्धन हा एकमेव असतो. पर्यटनाची संधी हा काही त्याचा प्रमुख हेतू नव्हे! समुद्रकिनारी जाऊन मस्त उन्हे खात पडावे, अंगांवर लाटा घ्याव्यात, झकास खिदळावे, जमल्यास थोडी अधिक प्रौढ गंमतजंमत करावी, हे तर पर्यटनाचे जुनाट स्वप्न. किंबहुना काही दशकांपूर्वी पर्यटन म्हटले की नारळाचे झाड, समुद्राच्या लाटा नि असले काहीबाहीच जाहिरातींमध्ये दिसायचे. आता पर्यटकांच्या झुंडी किनाऱ्यांवरुन उठून डोंगर शोधू लागल्या, कुणी साहसी सहलींच्या निमित्ताने डोंगररांगाकडे निघतात, तर कुणी देवस्थानांच्या भक्तिमार्गावर चालणारे असतात. यापलिकडेही एक शहरी वर्ग असतो तो जंगलांचा अचानक पुळका आलेल्यांचा. अर्थात निसर्गप्रेम हा काही ग्रामीण भागाचा मक्ता नाही, झाडाझुडांवर खरेखुरे प्रेम करणारी शहरी माणसेही असतातच. पण त्यांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी. बरीचशी मंडळी सुट्याबिट्या टाकून अभयारण्यात जाऊन वाघ बघण्याचा थरार अनुभवायला निघतात. बसगाड्या नि लोकलगाड्या बघणाऱ्या आपल्या बच्चेकंपनीला जंगलाची प्रत्यक्ष ओळख करुन देण्याचीही अनिवार इच्छा काही पालकांमध्ये असते. सगळेच निसर्गप्रेम काही एनिमल प्लॅनेट बघून व्यक्त होत नसते. त्या टीव्हीच्या पडद्यापलीकडेही हिरवाई असते, वन्यजीव असतात. जंगलातला वाघ असतोच देखणा. त्याचे ते उन्मुक्त वन्य लावण्य डोळ्यांचे पारणे फेडते. आभाळाशी स्पर्धा करणारे ते अर्जुन, सावरी, हिरड्याबेहड्याचे नि सागा-पळसाचे वृक्ष वेड लावतात. ती पक्ष्यांची किलबिल, मोरांचा केका, हरणांचे कळप, वानरांची खिसखिस... सारेच गारुड करणारे. या जंगलाचा राजा हा वाघ. हे जनावर वाचले तर जंगल वाचणार. जंगल नावाची इकोसिस्टिम हा वाघच चालवत असतो. त्याच्या ओढीने शहरी पर्यटक जंगलांकडे निघतात. एक पर्यटनाचा प्रवाह निर्माण होतो. हाटेले, उपाहारगृहे, तंबू, जीपगाड्या, खानपान, छायाचित्रण अशी एक वेगळी परिसंस्था उभी राहाते. या परिसंस्थेच्या केंद्रस्थानी मात्र वाघ नसतो. ती जागा घेतलेली असते, फुगलेल्या खिश्यांनिशी आलेल्या पर्यटकाने. इथं टायगर नव्हे, टूरिस्टाला नायक समजले जाते. इथेच सगळा मामला बिघडतो. जिम कॉर्बेट राष्ट्रीय अभयारण्यात पर्यटकांच्या सोयीसुविधांसाठी हजारो झाडे कापून पर्यटन केंद्र उभारणीची जागा साफसूफ करण्यात आली. उत्तराखंडचे तत्कालीन वनमंत्री हरकसिंग रावत आणि वनअधीक्षक किशनचंद या दोघांनी सगळे कायदेकानू धाब्यावर बसवत जिम कॉर्बेट च्या दारात विकास आणला. हे हरकसिंग रावत तेव्हा, म्हणजे २०२१ मध्ये भाजप सरकारमध्ये वनमंत्री होते, नंतर त्यांनी वाघासारखेच काँग्रेसमध्ये स्थलांतर केले! सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण होते. या रावतमहाशयांवर संतप्त ताशेरे ओढत सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने जंगलाचे झालेले नुकसान यांच्याकडून भरून घ्या, असा आदेश काढला आहे. नागरिकांचा विश्वास कचरापेटीत टाकण्याची ही सत्ताधाऱ्यांची कृती केवळ न्यायालयालाच नव्हे, तर कुठल्याही सच्च्या निसर्गप्रेमी व्यक्तीला संताप आणणारी आहे. अभयारण्ये किंवा राष्ट्रीय वने निर्माण करण्यामागचा हेतू वन्यजीवांचे संरक्षण आणि संवर्धन हा एकमेव असतो. पर्यटनाची संधी हा काही त्याचा प्रमुख हेतू नव्हे. पण वन्यजीवांचे संवर्धन हे पैसा घालवणारे काम आहे, आणि त्यांच्या जीवावर पर्यटक मिळवणे हे पैसा कमावण्याचे साधन आहे. हेतू बदलला की आपोआप प्राधान्यक्रम बदलतात. जिम कॉर्बेट नॅशनल पार्कबाबत नेमके हेच झाले आहे. वारेमाप जंगलतोड हे काही फक्त जिम कॉर्बेट अभयारण्याचे दुःख नाही. जगातील बहुतेक सर्वच जंगलांची जमेल तितकी हेळसांड मानवप्राण्यातर्फे चालू आहे. जिम कॉर्बेट प्रकरणाने राजकीय वळण घेतल्याने त्याची चर्चा झाली. शिवाय हे नॅशनल पार्क भारतातले अगदी पहिले! जिथे वाघांच्या आणि अन्य वन्यजीवांच्या अनेक पिढ्या सुखाने नांदल्या, तिथे आता मानवी हस्तक्षेप इतका वाढला की कोअर विभागाच्या जवळपासही पर्यटकांच्या जीपगाड्या फिरता कामा नयेत, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाला काढावा लागला. रावत आणि किशन चंद यांच्या बेमुर्वतपणामुळे येथील वाघांचा वावरही नष्ट झाला आहे. सत्तेच्या जोरावर आणि पैशाच्या लोभापायी इतके दुस्साहस करणे यांना का आणि कसे जमले? याचे उत्तर पुन्हा हेतूबदलातच दडलेले आहे. जंगलास निसर्ग परिसंस्था न मानता पर्यटनस्थळ म्हणून बघितले गेले की असे होणारच. मग गर्दीने जगणाऱ्या मानवप्राण्यांच्या किमान सुविधांसाठी शेशंभर झाडे तोडली तर काय बिघडले, असा सवाल काही प्रखर विकासवादी करतात. विकासाचीही किंमत असते, आणि निसर्ग ती आपल्याकडून वसूल करत असतो, यात शंका नाही. पण ती किती मोजायची याला काही मानवी मयार्दा आहेत. जिथे मूलभूत सोयीसुविधा किंवा सुरक्षिततेचा प्रश्न असेल तिथं निसगार्ची मयार्देत कत्तल करुन त्याची भरपाईही अन्यत्र करण्याचा मार्ग अवलंबला जातो.

# नस्ती उठाठेव कशाला?



स्त्रीने आपले नाव काय ठेवायचे, ते बदलायचे की नाही, या जुन्या झालेल्या मुद्द्यांमध्ये सरकारी यंत्रणांनी कशाला नाक खुपसावे ? काही काळापूर्वी एखाद्या विवाहित स्त्रीला काहीही विचारले, तरी ह्यआमच्या ह्यांना विचारून सांगतेह्न, असे उत्तर येत असे. साध्या भाजीखरेदीपासून ते अगदी घर किंवा सोन्याच्या खरेदीपर्यंत कशालाही हेच उत्तर दिले जायचे. अगदी स्वयंपाकाची भांडी खरेदी करायला गेल्यावरही ज्या भांड्याला नवऱ्याचा स्वयंपाकघरात कधी हातही लागणार नसे, त्या भांड्यावरही स्त्रिया आवर्जून नवऱ्याचेच नाव घालत. एवढेच नाही, तर मालक, धनी, साहेब अशा वर्चस्ववाचक शब्दांनीच नवऱ्याचा उल्लेख केला जात असे. हा काळ मागे सरला, आता स्त्री पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून उभी आहे, तिचे आणि तिच्या नवऱ्याचे सहजीवन बरोबरीच्या पायावर उभे आहे, असे तुम्हाला वाटत असेल तर ते साफ चूक आहे. महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे यांनी आपल्या अथक परिश्रमातून चिखलात रुतलेला स्त्रीजीवनाचा जो गाडा बाहेर काढला, तो पुन्हा त्याच चिखलात ढकलण्याचे, काळाची चाके पुन्हा उलटी फिरवण्याचे प्रयत्न अगदी थेट सरकारी पातळीवरून सुरू आहेत, असे म्हणणे किंचितही अतिशयोक्तीचे होणार नाही असे चित्र आहे. झाले आहे असे की गृहनिर्माण आणि शहर व्यवहार मंत्रालयाने घटस्फोटित स्त्रीला सासरचे नाव बदलून माहेरचे नाव लावायचे असेल, तर घटस्फोटाची कागदपत्रे सादर करावी लागतील किंवा नवऱ्याचे ना हरकत प्रमाणपत्र द्यावे लागेल, अशी अधिसूचना काढली. ही अधिसूचना नाव बदलण्याच्या आपल्या अधिकाराच्या स्वातंत्र्याविरोधात आहे, असे म्हणत दिव्या मोदी-टोंग्या यांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. दिल्ली उच्च न्यायालयाने हा असला अजागळ निर्णय रद्द न करता या मुद्द्यावर केंद्र सरकारचे मत मागितले. एक सरकारी यंत्रणा मध्ययुगाकडे जाणारी एक अधिसूचना काढते, त्यावर मत मागवणे एकवेळ, चाकोरीबद्ध न्यायालयीन कार्यपद्धतीचा भाग म्हणून आश्चर्याचे ठरणार नाही. पण अजब म्हणजे या सगळ्यात कुणालाही हे सगळे जिच्याबद्दल सुरू आहे, त्या स्त्रीचे मत विचारणे वा विचारात घेणे आवश्यक वाटत नाही. विवाहानंतर स्त्रीने नाव बदलून पतीचे नाव आणि आडनाव लावणे ही जगभरात बहुतांश ठिकाणी प्रचलित असलेली पद्धत. स्त्रियांना जसजशी आपल्या हक्कांची जाणीव होऊ लागली, स्वभान येऊ लागले, तसतसे त्या प्रश्न विचारू लागल्या. लग्न झाल्यावर वडिलांचे नाव काढून त्या जागी पतीचे नाव का लावायचे, जिने नऊ महिने पोटात वागवले, जोजवले, वाढवले, खस्ता खाल्ल्या, त्या आईच्या नावाचा कुणाही व्यक्तीच्या नावांत समावेश का नाही, मुळात लग्न झाल्यानंतर स्त्रीने आपले नाव का बदलायचे असे मुद्दे उपस्थित होऊ लागले. एकेकाळी साताठ वर्षांचे वय झाले की विवाह होत. त्यामुळे नाव बदलणे आणि बदललेले नाव स्वीकारणे ही गोष्ट फार त्रासदायक होत नसे. पण आता विशी-पंचविशीनंतर मुली विवाह करतात. एवढ्या काळात वाढलेली, फुलवलेली स्वतःची ओळख निव्वळ विवाह झाला म्हणून पुसून टाकायची हे स्वीकारणे त्यांना जड जातेच, शिवाय पुरुषाच्या आयुष्यात लग्नामुळे कोणताही बाह्य बदल होत नाही, ना त्याला नाव बदलावे लागते, ना मंगळसूत्रासारखा एखादा दागिना घालावा लागतो, मग मीच हे बदल का करायचे हे प्रश्न त्या विचारू लागल्या. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे नवरा आपला मालक किंवा धनी नाही, तर तो सहजीवनामधला जोडीदार आहे, सुखदुःखामधला भागीदार आहे, या मानसिकतेपर्यंत त्या पोहोचल्या आहेत. त्या अर्थार्जन करतात, त्याच्या बरोबरीने उभ्या राहून संसाराचा गाडा हाकतात. किंबहुना कधीकधी त्याच्याहून कांकणभर अधिकच जबाबदारी अंगावर घेतात आणि ती निभावतात. सर्वच स्त्रियांच्या बाबतीत सरसकटपणे हे घडत नसले तरी शहरी भागात शिक्षण, अर्थार्जन, त्यातून मिळणारे स्वातंत्र्य या सगळ्यामधला मोकळेपणा स्त्रीच्या जीवनात दिसू लागला आहे. लग्न करायचे की नाही, कुणाशी करायचे, कधी करायचे, मुले हवीत की नकोत, किती व्हावीत, कधी व्हावीत, त्यांना कसे वाढवायचे या सगळ्यासंदर्भात त्यांना स्वतःची मते असतात आणि ती व्यक्त करायला आणि राबवायला त्या जराही संकोचत नाहीत. वेगवेगळे राजकीय पक्ष जिचा उल्लेख करतात ती नारी शक्ती स्त्रियांच्या या स्वातंत्र्यापेक्षा, मोकळेपणाने जगण्यापेक्षा वेगळी असते का? नाही ना? मग स्त्रीने आपल्या नावाचे काय करायचे याची उठाठेव सरकारने का करावी ? शिवाय कुणालाही आपले नाव बदलायचे असेल तर राजपत्र- गॅझेट- ही व्यवस्था आधीपासून प्रचलित आहे. ती सोडून एकतर घटस्फोटाची प्रत द्या किंवा पतीचे नाव काढून माहेरचे नाव लावण्यासाठी नवऱ्याकडून ना हरकत प्रमाणपत्र आणा हा आचरटपणा कशासाठी? आधीच विवाहानंतर माहेरचे नाव न बदलता तसेच ठेवणाऱ्या स्त्रियांना कशाकशाला तोंड द्यावे लागते याची या यंत्रणांना जाणीव आहे का? अगदी अलीकडे परिस्थिती किंचित बदलली असली तरी याआधीच्या पिढीतील लग्नानंतर नाव न बदललेल्या स्त्रियांनी रेशन कार्ड, बँक, पासपोर्ट, आधार या सरकारी कागदपत्रांवर आपले नाव बदलले जाऊ नये, तसेच राहावे यासाठी या यंत्रणांचे उंबरठे झिजवले आहेत. कितीही समजावून सांगितले तरी आपल्यासमोर बसलेली विवाहिता विवाहानंतर नाव का बदलत नाही, हे तिथल्या बथ्थड बाबूलोकांच्या डोक्यात शिरत नसे हा त्यांचा अनुभव आहे. रेशन कार्डावर कुटुंबप्रमुख म्हणून स्त्रीचे नाव असणे किंवा कोणत्याही सरकारी दस्तावेजात तिने माहेरच्या नावानेच कागदोपत्री वावरणे हा त्यांच्या लेखी या स्त्रीमुक्तीवाल्या बायांकडून बिचाऱ्या पुरुषावर घोर अन्याय होता.

काळाच्या रेट्याने ही परिस्थिती थोडीशी का होईना बदलली आहे. आज स्त्रियांना लग्नानंतर नाव न बदलण्यासाठी पूर्वीइतका संघर्ष करावा लागत नाही. एखादी नाव बदलणार नाही, तेच नाव ठेवेल हे स्वीकारले जाते. असे करणारीकडे स्त्रीमुक्तीवाली बाई म्हणून हेटाळणीपूर्वक बघितले जात नाही. पुरुषप्रधानतेची अवजड दारे थोडी किलकिली झाली आहेत. आपल्या खांद्यावरचे पुरुषप्रधानतेचे ओझे बाजूला ठेवून मोजके का होईना पुरुष स्त्रीवादी विचार निदान समजून घेऊ लागले आहेत. एखादा दुसरा तो आचरणातही आणू पाहतो आहे. नवी पिढी नेहमीच अधिक मोकळेपणा घेऊन येते, नवी क्षितिजे धुंडाळू पाहते. नवा विचार तिला खुणावत असतो. काही पुरुष आपल्या नावात वडिलांच्या आधी आईचे नाव लावताना दिसतात, ते यामधूनच. व्यक्ती म्हणून स्त्रीला तिचा तिचा अवकाश आहे, आणि तो तिने घ्यावा ही धारणा असलेल्या पुरुषांची संख्या वाढताना दिसते आहे. आपण स्त्रीचे मालक नाही, ती आपली मालमत्ता वा संपत्ती नाही, तिला कोणत्याच गोष्टीसाठी आपल्या परवानगीची गरज नाही, हे त्यांना हळूहळू का होईना स्वीकारता येऊ लागले आहे.

स्त्रीपुरुष या नात्यात जसे आनंदाचे क्षण येतात तसेच ताणतणाव, बेबनाव, कटुताही येऊ शकते. पण त्या प्रसंगांना त्यांनी आपापल्या पद्धतीने हाताळावे हे उत्तम. त्यातही स्त्रीने आपले नाव काय ठेवायचे, ते बदलायचे की नाही, या जुन्या झालेल्या मुद्द्यांमध्ये सरकारी यंत्रणांनी कशाला नाक खुपसावे? आपण आता मध्ययुगात जगत नाही पुरुष हा स्त्रीचा मालक नाही आणि स्त्री ही त्याची गुलाम नाहीह्न ही दोन भिन्नलिंगी माणसे त्यांना हवे ते करण्यास मुखत्यार आहेत, हे अद्यापही या यंत्रणांच्या पचनी पडत नाही, हे महिला दिन वगैरे साजरा झाल्यानंतरचे वास्तव.

# दिव्यातील दुकानदारांची ऑनलाइन फसवणूक

## दिवा मर्चंट सेवा संस्थेच्या अध्यक्षांनी आरोपीला दिले पकडून

**दिवा :** दिव्यातील व्यापाऱ्यांकडून वस्तू घेऊन त्यांना ऑनलाईन पद्धतीने पैसे देण्याच्या फसवणूकीच्या अनेक घटना समोर आल्या आहेत.पण ग्राहकांकडून संबंधित व्यापाऱ्याला पैसेच न आल्याने त्याने याची माहिती दिवा मर्चंट सेवा संस्थेच्या अध्यक्षा ज्योती राजकांत पाटील यांना सांगितली. पाटील यांनी संबंधित टोळीतील एका आरोपीला पकडून दिले.



गेल्या दोन ते तीन महिन्यात एक ७ जणांची टोळी दिव्यातील विविध भागातील दुकानांमध्ये जाऊन वस्तू खरेदी करुन फोन पे, गुगल पे किंवा अकाउंटला पैसे टाकल्याचे मोबाईल मधील फोटो टाखवून फसवित असल्याचे समोर आले. या टोळक्याद्वारे किमान १० ते १२ व्यापाऱ्यांना त्यांनी गंडा घातला आहे. त्यातील एका व्यापाऱ्याने दिवा मर्चंट सेवा संस्थेच्या अध्यक्षा ज्योती राजकांत पाटील यांना माहिती दिली. पाटील यांना माहिती मिळताच संबंधित गोष्टीची तातडीने दखल घेऊन व्यापाऱ्यांमार्फत या टोळीतील वैभव दास याची माहिती दिवा पोलीस चौकीला दिली. त्यानंतर तत्काळ आरोपीस पोलिसांनी अटक केली. या केसचा पुढील तपास ए. पी. आय खंडू तांबे करत आहेत. वैभव दास याच्या विरुद्ध दहा ते पंधरा व्यापाऱ्यांनी गुन्हा नोंद केला आहे. ही फसवणूक करणारी ७ जणांची टोळी सक्रीय असून ही यातील आता पर्यंत दोन जणांना अटक झाली आहे. या टोळीतील उर्वरित मुले ही चेंबुर येथील राहणारी असून त्यांना पकडण्यासाठी पोलीसांची टिम पुढील तपास करत आहेत. या टोळीकडून १२ व्यापाऱ्यांना अंदाजे ४ ते ५ लाखांपर्यंत फसवणूक झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलीसांना दिला आहे. दोन ज्वेलर्स, चार भांड्यांची दुकाने तर चार कपड्यांच्या दुकानांमध्ये ही ऑनलाईन फसवणूक झाली आहे. अशी फसवणूक करणाऱ्या वैभव दास याच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे व व्यापाऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे असे निवेदन दिवा मर्चंट सेवा संस्थेचे अध्यक्षा ज्योती राजकांत पाटील व दिव्यातील व्यापाऱ्यांनी दिले आहे.

# शहापुरातील शेरे परिसरात बिबट्याचा वावर

## गोंधळी पाड्यात पाळीव कुत्र्यावर हल्ला



**खर्डी :** शहापूर तालुक्यातील शेरे गावाच्या परिसरात बिबटयाचा वावर दिसून आला असून ६ मार्च रोजी रात्रीच्य सुमारास गोंधळी पाडा येथील बालाराम गणपत अंदाडे यांच्या मालकीच्या पालीव कुत्र्याची शिकार या बिबटयाने केली आहे. या घटनेमुळे या परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी परिसरातील गाव पाड्यांमध्ये जनजागृतीचे काम करत आहेत. समृद्धी महामार्ग हा शहापूर तालुक्यातील बहुतांशी जंगल भागातून जात असल्याने अन्नसाखळीतील प्रमुख घटक समजला जाणारा बिबटया अन्नाच्या शोधात शहापूर तालुक्यातील गावागावांमध्ये दिसून येत आहे.



> शेरे परिसरातील नागरिकांनी रात्रीच्या वेळी शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे, बिबटयाचा वावर दिसून आल्यास त्याचा पाठलाग किंवा छेड काढणे जीवावर बेतू शकते. आपत्तीच्या वेळेस एकटयाने घराबाहेर पडण्याचे धाडस करू नये. घरातील पाळीव प्राणी बंदिस्त ठिकाणी ठेवण्याची सुविधा करावी. घराबाहेरील विजेचे दिवे सुरू ठेवावेत.फटाके किंवा वाद्य वाजवावे नागरिकांनी रात्री येथील रस्त्यावरून दुचाकीवरून जाणे शक्यतो टाळावे व सावधगिरी बाळगून स्वतःची काळजी घ्यावी.
>
> **भाग्यश्री पोळे, सहाय्यक उपवन संरक्षक, शहापूर**

यापूर्वी देखील कसारा, डोळखांब, धसई, वाशाळा,विहिगाव या वनपरिक्षेत्रांमध्ये बिबटयाचा वावर दिसून आला होता.येथील कलम पाडा, भातसई, शेरे,शेई ,अंबर्जे,मासवणे, आंबिवली,बावघर, वेहले या गावांमधील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून वन विभागाच्या वतीने जंगल परिसरात ठिकठिकाणी सूचनाफलक लावण्यात येत आहेत. बिबटयाच्या पायाचे ठसे या ठिकाणी दिसून आले असले तरी ते नक्की ठसे बिबटयाच्या पायाचे आहेत की अन्य कुठल्या वन्य हिंस्त्र प्राण्याचे आहेत हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पाळीव कुत्र्याचा मृतदेह वन विभागाच्या हाती लागला असून या कुत्र्याची शिकार बिबटयानेच केली असे येथील नागरिक ठामपणे सांगत आहेत. वनविभागाचे शहापूर उपवन संरक्षक सचिन रेपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली या परिसरात तीन ट्रॅप कॅमेरे बसविण्यात आल्याचे शहापूर वनपरिक्षेत्र अधिकारी शैलेश गोसावी यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. आज पासून रात्रीच्या वेळी वनविभागाची गस्त सुरू करण्यात येणार असून नागरिकांनी घाबरून जाण्याची गरज नसल्याचे तसेच सावधगिरी बाळगण्याचे आवाहन शेरे वनपाल साईनाथ साळवी यांनी केले आहे.

# Mumbai's Gokhale bridge-flyover alignment fiasco: Suspend BMC chief, says Aaditya Thackeray

**Mumbai** : Aaditya Thackeray on Friday said that Mumbai civic commissioner (administrator) IS Chahal should be placed under suspension for the Gokhale bridge-flyover alignment fiasco Mumbai's Gokhale bridge-flyover alignment fiasco: Suspend BMC chief, says Aaditya Thackeray



Shiv Sena (UBT) leader Aaditya Thackeray on Friday said that Mumbai civic commissioner (administrator) IS Chahal should be placed under suspension for the Gokhale bridge-flyover alignment fiasco, reported the PTI.

Mumbai: MERC partly allows Tata Power`s plea for tariff hikes

It was noticed after construction of the bridge over the tracks at Andheri railway station that it did not align with the connecting Barfiwala flyover that was built just over a decade ago, as per the PTI.

According to the PTI, in his letter to Maharashtra Governor Ramesh Bais, Aaditya Thackeray said that apart from IS Chahal, top ranking railway officials involved in the project must also be suspended since the fiasco has resulted in wastage of taxpayers' money to the tune of several crore rupees.

"The Gokhale bridge reconstruction by the Brihanmumbai Municipal Corporation (BMC) and Railways is a national shame. It is an example of politician-official nexus. The news has reached all over the globe but the two agencies continue to play a blame game," Aaditya Thackeray said, as per the PTI. Aaditya Thackeray also posted the letter he wrote to Maharashtra

# Suspended tehsildar, husband booked for disproportionate assets

**Navi Mumbai:** The Navi Mumbai police have filed a case against a suspended tehsildar from Maharashtra's Raigad district and her husband for owning assets that are disproportionate to their known income sources, said an official on Friday. Meenal Krishna Dalvi (49), the suspended tehsildar, and her husband Krishna Vasant Dalvi (55) are facing charges as a result of an open investigation launched by the Anti-Corruption Bureau (ACB) into a case filed in 2022 involving alleged corruption, reported PTI. According to the report, Deputy Superintendent of Police Shivraj Mhetre, representing ACB Navi Mumbai, revealed that the pair has accumulated assets worth Rs 2.2 crore, which exceeds their known sources of income by around 84 per cent. As a result, a FIR has been filed against the couple at the APMC police station in Navi Mumbai, PTI report added. Meanwhile, in another incident, according to an official statement released on Friday, the Central GST officials discovered a scheme in Palghar, Maharashtra, involving the fraudulent claim of input tax credit (ITC) worth about Rs 25 crore through the use of fictitious invoices and phoney firms, stated another PTI report. According to the report, the official stated that the fraud came to light after the CGST's Palghar commissioner (Mumbai zone) started

# Siddhesh Kadam defends his appointment as Maharashtra Pollution Control Board chief

**Mumbai** : The son of Shiv Sena leader Ramdas Kadam and the head of the Maharashtra Pollution Control Board (MPCB), Siddhesh Kadam, defended his selection to the important position by claiming that careful consideration was required before making the decision. Siddhesh underlined that the state government and the office of the Maharashtra chief minister must have carried out appropriate scrutiny before finalising his appointment in the face of criticism against his selection on social media from political workers, reported PTI. "The state



government and the office of Maharashtra chief minister made my appointment as the chairman of the Maharashtra Pollution Control Board. The department concerned must have done proper scrutiny before arriving at this decision," Siddhesh told PTI. According to the report, in response to criticism of his nomination, Siddhesh emphasised his educational background by saying, "I am a science graduate and hold an MBA (international) degree from Deakin University of Australia. I should be judged by the work I do. I will respond to the criticism only through my work." A person appointed as the chairperson of the MPCB shall have substantial experience in environmental protection problems or institutions that deal with environmental protection, per the gazette notification of the Environment and Climate Change Department, the report in PTI stated. The announcement also listed the educational requirements needed for the role, which include, among other things, a Master's degree in environmental science

# सोन्याची तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## १६ किलोपेक्षा जास्त सोने ▌२.६५ कोटींची रोकड जप्त



**मुंबई** : महसूल गुप्तचर संचालनालयाने सोन्याची तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईमध्ये अधिकाऱ्यांनी १६ किलोपेक्षा जास्त सोने आणि २.६५ कोटी रुपयांची रोकड जप्त केली आहे. सोन्याची तस्करी करून त्याची बाजारात विक्री होत असल्याच्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी तस्करी केलेले १०.४८ कोटी रुपयांचे एकूण १६.४७ किलो, तस्करी केलेल्या सोन्याच्या विक्रीतून मिळालेली चांदी आणि २.६५ कोटी रुपये रोख रक्कम ताब्यात घेण्यात आली आहे. टोळी प्रमुखासह एकूण ६ व्यक्तींना अटक करण्यात आली असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

तस्करी करून आणलेल्या सोन्याची खरेदी-विक्री करण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या जागेची अधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांनी तपासणी केली. यावेळी तेथे परदेशी बनावटीचे मुख्यतः विटांच्या स्वरूपातील १०.७ किलो सोने तसेच सोने तस्करीच्या विक्री व्यवहारांतून मिळवलेली १.८ कोटी रुपयांची रोख रक्कम असा मुद्देमाल अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतला.

धाडीदरम्यान अधिकाऱ्यांनी या टोळीतील दोन जणांना ताब्यात घेतले. यापैकी एक जण ही टोळी चालवत असल्याचे निदर्शनास येताच त्याच्या घरी टाकलेल्या धाडीत तस्करी करून आणलेले ३.७७ किलो सोने ताब्यात घेण्यात आले. मिळालेल्या अधिक माहितीवरून ५ मार्च रोजी टोळीच्या प्रमुखाच्या घरी शोधमोहीम राबवण्यासाठी एक पथक नियुक्त करण्यात आले. पथकातील अधिकाऱ्यांना पाहून त्या माणसाने १४ व्या मजल्यावरील त्याच्या निवासस्थानातून संशयास्पद वस्तू फेकून दिल्या. अधिकाऱ्यांनी या परिसरातून ६० लाख रुपयांची रोकड हस्तगत केली. चौकशीदरम्यान टोळी प्रमुखाने आपला फोन आणि परदेशी बनावटीच्या सोन्याच्या दोन विटा फेकून दिल्याचे सांगितले. सुमारे १५ तास शोधमोहीम आणि पाठपुरावा केल्यानंतर ६ मार्च रोजी टोळी प्रमुखाच्या सोसायटीला लागून असलेल्या दोन सोसायट्यांमधील दोन रहिवाशांकडून टोळी प्रमुखाच्या मालकीचे ३ मोबाईल फोन आणि प्रत्येकी १ किलो वजनाच्या २ सोन्याच्या विटा ताब्यात घेतल्या. या रहिवाशांना तपासणीच्या रात्री योगायोगाने या वस्तू मिळाल्या होत्या आणि त्यांनी त्या स्वतःजवळच ठेवल्या होत्या. या प्रमुखाची पत्नीदेखील या टोळीची सक्रिय सदस्य आहे आणि ती कारमधून पळून जात आहे, अशी माहिती मिळाल्यावर तिला अडवण्यासाठी पथक तैनात करण्यात आले. सहा तासांच्या पाठलाग केल्यानंतर तिची धरपकड करण्यात आली. पकडल्यानंतर सोने विक्री व्यवहारांतून मिळालेली चांदी आणि रोख रक्कम ठेवलेली तिजोरी तिच्या फार्महाऊसवर असलेल्या मदतनीसाच्या घरी ठेवल्याची कबुली तिने दिली. मदतनीसाच्या घरी धाड टाकून ६ किलो सोने आणि २५ लाख रुपयांची रोकड ताब्यात घेण्यात आली. या प्रकरणी तस्करी केलेले १०.४८ कोटी रुपयांचे एकूण १६.४७ किलो, तस्करी केलेल्या सोन्याच्या विक्रीतून मिळालेली चांदी आणि २.६५ कोटी रुपये रोख रक्कम ताब्यात घेण्यात आली आहे.

# गुजरातमधून आणलेला ३० लाखांचा गुटखा पकडला



**कल्याण** : गुजरात, वापी येथून चोरट्या मार्गाने आणलेला ३० लाख रुपयांचा प्रतिबंधित गुटख्याचा साठा कल्याणमधील दुर्गाडी किल्ला येथे खडकपाडा पोलिसांनी जप्त केला आहे. गुटखा घेऊन येणाऱ्या मोहम्मद राजा मोनीस पठाण (२६) या ट्रकचालकाला पोलिसांनी अटक केली असून या प्रकरणातील मुख्य फरार आरोपी विनोद गंगवाणी याचा पोलीस शोध घेत आहेत. कल्याणमधील दुर्गाडी परिसरात गस्त घालत असताना गुरुवारी दुपारी खडकपाडा पोलिसांना दुर्गाडी किल्ला येथून एक ट्रकचालक भरधाव वेगात संशयास्पदरीत्या ट्रक चालवत असल्याचे आढळले. पोलिसांनी पाठलाग करून ट्रक रोखून धरला. ट्रकमध्ये काय आहे याची माहिती विचारली असता ट्रकचालकाने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पोलिसांनी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त बोलावून ट्रकची तपासणी केली असता त्यात प्रतिबंधित गुटख्याचा साठा आढळला. १० गोण्यांमध्ये विमल पान मसाला तसेच तंबाखू जर्दा असा एकूण ट्रकसह ३० लाखांचा साठा पोलिसांनी यावेळी जप्त केला. हा गुटखा उल्हासनगर परिसरात नेऊन तेथून त्याची घाऊक पद्धतीने विक्री करण्याचा तस्करांचा उद्देश असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला. पोलिसांनी ट्रकचालक मोहम्मद व फरार आरोपी विनोद गंगवाणी यांच्याविरुद्ध मानवी जीवनास हानीकारक होईल, अशा प्रतिबंधित गुटख्याची विक्री तसेच अन्न आणि औषध प्रशासन कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. खडकपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अनिल वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ए. ए. शिवले, सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल गायकवाड, ए. एम. जाधव या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# 'त्या' तहसीलदारासह पतीला अपसंपदा बाळगल्याप्रकरणी अटक

**नवी मुंबई** : दोन लाखांची लाच स्वीकारल्यामुळे निलंबित करण्यात आलेल्या अलिबागच्या तत्कालीन तहसीलदार मीनल दळवी यांनी त्यांच्या सेवाकाळात भ्रष्ट व गैरमार्गाने तब्बल २ कोटी ६२ लाखांहून अधिकची संपत्ती कमावल्याचे ॲण्टी करप्शन ब्युरोने केलेल्या तपासणीत उघडकीस आले आहे. तसेच मीनल दळवी यांना त्यांच्या पतीने अपसंपदा मिळवण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे नवी मुंबई ॲण्टी करप्शन ब्युरोने मीनल कृष्णा दळवी आणि त्यांचे पती कृष्णा वसंत दळवी या दोघांविरोधात अपसंपदा बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली आहे. न्यायालयाने या दोघांची ७ दिवसांच्या पोलीस कोठडीत रवानगी केली आहे.

नोव्हेंबर २०२२ मध्ये मीनल दळवी या अलिबागच्या तहसीलदार या पदावर असताना त्यांनी वडिलोपार्जित आईकडून बक्षीसपत्र स्वरूपात मिळालेल्या जमिनीच्या सातबाऱ्यावर मुलाच्या नावाची नोंद करण्यासाठी, तसेच याबाबत असलेल्या अपिलावर तक्रारदाराच्या बाजूने निकाल देण्यासाठी राकेश चव्हाण या खासगी व्यक्तीच्या माध्यमातून २ लाख रुपयांची लाच स्वीकारली होती. त्यावेळी नवी मुंबई ॲण्टी करप्शन ब्युरोच्या पथकाने तहसीलदार मीनल दळवी यांना तसेच खासगी व्यक्ती राकेश चव्हाण या दोघांना रंगेहाथ पकडले होते. त्यानंतर मीनल दळवी व राकेश चव्हाण या दोघांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर ॲण्टी करप्शन ब्युरोच्या महासंचालकांनी मीनल दळवी यांच्या मालमत्तेची उघड चौकशी करण्याचे आदेश दिले होते.

नवी मुंबई ॲण्टी करप्शन ब्युरोचे पोलीस उपअधीक्षक शिवराज म्हेत्रे व त्यांच्या पथकाने मीनल दळवी यांच्या मालमत्तेची तपासणी केली असता, मीनल दळवी यांनी त्यांच्या सेवा कालावधीत व परीक्षण कालावधीदरम्यान, भ्रष्ट व गैरमार्गाने त्यांच्या उत्पन्नापेक्षा अधिक किमतीची तब्बल २ कोटी ६२ लाख इतक्या रकमेची (९८.९७ टक्के) मालमत्ता संपादित केल्याचे आढळून आले. त्याचप्रमाणे मीनल दळवी यांनी कमावलेली बेकायदेशीर मालमत्ता त्यांच्या पतीने स्वतःच्या नावाने बाळगून मीनल दळवी यांना बेकायदेशीरपणे अपसंपदा मिळवण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे आढळून आले. त्यामुळे नवी मुंबई ॲण्टी करप्शन ब्युरोने मीनल दळवी व त्यांचे पती कृष्णा दळवी या दोघांविरोधात एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

# बनावट देशी दारूच्या ४८ हजार बाटल्या जप्त

## उत्पादन शुल्क विभागाची कारवाई



**कल्याण** : राज्य उत्पादन शुल्क विभागाने कल्याणमध्ये बनावट देशी दारूच्या ४८ हजार बाटल्या जप्त केल्या आहेत. बनावट देशी दारूची वाहतूक करणाऱ्या साईनाथ रामगिरवार, अमरदीप फुलझेले या दोघांना बेड्या ठोकल्या आहेत. जप्त करण्यात आलेल्या बाटल्यांवर नगर जिल्ह्यातील देशी दारू बनवणाऱ्या एका नामांकित कंपनीचे लेबल लावण्यात आले होते.

कल्याण-मुरबाड रोडवरून येणाऱ्या एका ट्रकमध्ये बनावट दारूचा साठा असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे उत्पादन शुल्क विभागाच्या कल्याण विभागाने कल्याण-मुरबाड रोड परिसरात सापळा रचला. सुभाष चौक परिसरात हा ट्रक दिसताच उत्पादन शुल्क विभागाच्या कर्मचाऱ्यांनी हा ट्रक थांबवला. तपासणी केली असता ट्रकमध्ये बनावट देशी दारूचा साठा आढळून आला. ४८ हजार ४०० बाटल्या या ट्रकमध्ये होत्या. याप्रकरणी उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने ट्रकमधील साईनाथ रामगिरवार, अमरदीप फुलझेले या दोघांना ताब्यात घेतले असून बनावट देशी दारूचा साठादेखील जप्त केला. या दारूच्या बाटल्यांवर नगर जिल्ह्यातील एका नामांकित कंपनीचे लेबल लावण्यात आले होते. हा साठा या दोघांनी कुठून आणला होता व कुठे घेऊन जाणार होते, कुणाला विक्री करणार होते याचा शोध आता उत्पादन शुल्क विभाग करत आहे.

## रॉक क्लाइंबिंग करताना तरुण जखमी

**ठाणे** : मानपाडा येथील संजय गांधी नॅशनल पार्क डोंगरावर रॉक क्लाइंबिंग करत असताना मुलुंड येथील रोशन शहा तरुण अंदाजे ३० फूट उंची वरून खाली पडून जखमी झाला आहे. ही घटना शुक्रवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास समोर आली आहे. त्याच्यावर ठाण्यातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली. शुक्रवारी सकाळी साडेआठच्या सुमारास ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षेच्या फोनवर रॉक क्लाइंबिंग करताना अंदाजे ३० फूट उंची वरून खाली पडून जखमी झाल्याची माहिती देण्यात आली. तातडीने ठामपा अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे आपत्ती व्यवस्थापन अधिकारी- कर्मचारी आणि आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान यांनी घटनास्थळी धाव घेतली. तर रोशन शहा यांना स्थानिक लोक व आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी यांच्या मदतीने डोंगरावरून खाली आणून रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले.त्यांना डोक्याला, छातीला, कमरेला, हाताला मार लागला आहे.

# कारवाईची भीती घालत महिलेला दोन लाखांना गंडा

मुंबई : कुरिअर कंपनीतून बोलत असल्याची बतावणी करीत नावावर बुक केलेल्या पार्सलमध्ये ड्रग्ज, पासपोर्ट, क्रेडिट कार्ड सापडल्याने गुन्हा दाखल झाल्याची बतावणी करून कारवाईची भीती घालत ठगांनी एका महिलेला दोन लाख रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार समोर आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करून शिवाजी पार्क पोलीस अधिक तपास करीत आहेत. दादर पश्चिमेकडील गोखले रोड परिसरात राहात असलेल्या ४७ वर्षीय अमृता या गृहिणी आहेत. ६ मार्चच्या दुपारी त्यांना अनोळखी मोबाईल नंबरवरून कॉल आला. कॉल करणाऱ्या व्यक्तीने अमृता यांना 'तुमचे पार्सल रिजेक्ट केले आहे,' असे सांगत एक नंबर डायल करण्यास सांगितले. अमृता यांनी तो नंबर डायल करताच त्यांचा कॉल शुभम गुप्ता नावाच्या व्यक्तीशी जोडला गेला.शुभमने तो फेडेक्स कुरिअर कंपनीतून बोलत असल्याची बतावणी करत पार्सल कार्ड नावाने नंबर देत तुमच्या मोबाईल नंबर आणि नावाचा गैरवापर करून पाच पासपोर्ट, तीन बँक क्रेडिट कार्ड, २० ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) ड्रग्ज, एक लॅपटॉप, ४.३ किलोग्रॅम क्लोथ, पेअर शूज असे पार्सल तैवान येथून झ्याग नावाच्या कोणी तरी तुमच्या नावाने आयसीआय क्रेडिट कार्ड नंबर आणि १५ हजार ६२५ रुपये देऊन पाठवल्याची बतावणी केली.

पार्सलमध्ये ड्रग्ज असल्याने आम्ही पोलीस सायबर क्राईमला कनेक्ट करतो, असे सांगत अन्य एका मोबाईल क्रमांकावर अमृता यांचा कॉल कनेक्ट केला. थोडे बोलणे झाल्यावर हा कॉल डिसकनेक्ट झाला. मात्र तोपर्यंत अमृता घाबरल्या होत्या. पुढे त्यांना स्कॉईप ॲप डाऊनलोड करण्यास भाग पाडून स्कॉईपवर सायबर क्राईम मुंबई सर्च करून त्यावर व्हिडीओ कॉल करण्यास सांगितले गेले. अमृता यांनी व्हिडीओ कॉल करताच त्यांच्या बँक खात्यातून १.६ मिलियनचे मनी लाँडरिंग झाले आहे. तसेच त्यांचे नाव ह्युमन ट्राफिकिंग आल्याचे सांगून आणखी घाबरवण्यात आले. आरोपींनी अमृता यांना त्यांच्या नावाचे एफआर लॉन्च केल्याचा फोटो पाठवून तुम्ही यात अडकला आहात, तुम्हाला अटक होईल, असे सांगून बँक खात्यातील रक्कम सुरक्षित ठेवण्याच्या बहाण्याने खात्यातील २ लाख ८ हजार ५०० रुपयांवर हातसाफ केला. अमृता यांच्या बँक खात्यातील रक्कम आरोपींनी सायबर ब्रँचच्या सर्व्हेलन्स अकाऊंटवर जमा करतो, असे सांगून जय महाकाली ट्रेडर्सच्या खात्यावर वळती करून घेतली होती. कॉल बंद करून काही काळ वाट बघितल्यानंतर अमृता यांनी त्यांना आलेल्या मोबाईल नंबरवर कॉल केला असता तो कॉल कर्नाटकमधील गावात लागला. त्यानंतर अमृता यांनी फेडेक्स कुरिअर कंपनीच्या टोलफ्री नंबर कॉल करून घडलेला प्रकार सांगितला असता त्यांनी फसवणूक झाल्याचे सांगितले. अखेर अमृता यांनी शिवाजी पार्क पोलीस ठाणे गाठून सायबर फसवणुकीची तक्रार दिली आहे.

# पत्नीबद्दल अपशब्द वापरल्याने मित्राची निर्घृण हत्या

**मुंबई** : दारू प्यायल्यानंतर पत्नीबद्दल अपशब्द वापरल्याने एका मासे विक्रेत्याने धारदार शस्त्राने वार करून मित्राची निर्घृणपणे हत्या केल्याची घटना शुक्रवारी पहाटे चेंबूरमध्ये घडली. याप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करन टिळकनगर पोलिसांनी आरोपी रोहित दीपक खर्पे (२९) याला बेड्या ठोकल्या आहेत.

चेंबूरच्या टी. वाय. थोरात मार्गावरील तंबी ब्रिजखाली एक तरुण रक्ताच्या थारोळ्यात पडल्याची माहिती शुक्रवारी पहाटे सव्वाचारच्या सुमारास मुंबई पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षाला मिळाली. घटनेची वर्दी मिळताच टिळकनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमी अवस्थेतील तरुणाला उपचारांसाठी जवळच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्याला दाखलपूर्व मृत घोषित केले. घटनेची नोंद करून टिळकनगर पोलिसांनी तपास सुरू केला. मृत तरुण हा नवी मुंबईतील सानपाडा परिसरात राहात असलेला भीमसेन देवचंद भालेराव (३५) असल्याचे उघड झाले. भालेराव हा गुरुवारी रात्री चेंबूरमध्ये आला होता. तो खर्पेसोबत दारू प्यायला बसला. या वेळी त्याने खर्पेच्या पत्नीबद्दल अपशब्द काढले. यामुळे खर्पे याने रागाच्या भरात धारदार शस्त्राने भालेरावर सपासप वार करून पळ काढल्याचे पोलीस तपासात समोर आले.

# दंड आकारल्याने रिक्षाचालक वाहतूक पोलिसाला भिडला

**कल्याण** : वाहतुकीचे नियम न पाळल्याने होणाऱ्या दंडात्मक कारवाईमुळे वाहतूक पोलीस आणि नागरिकांमध्ये दररोज खटके उडत आहेत. दंडात्मक कारवाई केल्याने भररस्त्यात एक रिक्षाचालक वाहतूक पोलीसाला भिडल्याची घटना कल्याणमध्ये घडली. वाहतूक पोलीस व रिक्षाचालकांमधील गोंधळामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.

कल्याणमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे वाहतूक पोलिसांकडून या परिसरात नो पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या गाड्यांवर सतत कारवाई केली जाते. या कारवाईमुळे अनेकदा नागरिक व वाहतूक पोलिसांमध्ये वाद होत असतात. दुपारी देखील याच चौकात नो पार्किंग झोनमध्ये एक रिक्षा उभी होती. वाहतूक पोलिसांनी या रिक्षाला दंड आकारला. त्यांची गाडी पुढे जाताच रिक्षाचालकाने वाहतूक पोलिसांची गाडी अडवली. आणि वाहतूक पोलीस कर्मचारी रोहिदास गावित याला कारवाई केल्याबद्दल जाब विचारला. यावेळी दोघांमध्ये सुरू असलेल्या वादममुळे भर रस्त्यात गोंधळ निर्माण झाला. अखेर गस्तीवर असलेल्या पोलिसांनी मध्यस्थी केली. नो पार्किंगमध्ये रिक्षा उभी केल्याने आपण दंडात्मक कारवाई केल्याचे वाहतूक पोलीस कर्मचारी रोहिदास गावित यांनी सांगितले. तर वाहतूक पोलीस नेहमीच रिक्षा चालकांना कारवाई करून त्रास देत असल्याचा आरोप रिक्षाचालकाने यावेळी केला.

# परराज्यातून चोरून आणलेल्या दोन ट्रकची महाराष्ट्रात विक्री

## बनावट कागदपत्रांच्या आधारे नागपूरच्या आरटीओमध्ये नोंदणी झाल्याचे उघड



नवी मुंबई : वाहने चोरणाऱ्या टोळीने परराज्यातून चोरून आणलेल्या दोन ट्रकच्या मूळ चेसीस नंबरमध्ये फेरबदल करून दोन्ही ट्रकची बनावट कागदपत्रांच्या आधारे नागपूर येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात नोंदणी केल्याचे व त्यानंतर दोन्ही ट्रकची मुंबईत विक्री केल्याचे उघडकीस आले आहे. नवी मुंबई पोलिसांच्या वाहन चोरी शोध पथकाने एपीएमसीतील ट्रक टर्मिनलमधून हे दोन ट्रक ताब्यात घेऊन त्यांची तपासणी केल्यांनतर हा प्रकार उघडकीस आला आहे. वाहन चोरी पथकाने या प्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील तपासाला सुरुवात केली आहे.

एपीएमसीतील ट्रक टर्मिनल परिसरात परराज्यातून चोरी करून आणलेली व महाराष्ट्रातील प्रादेशिक परिवहन कार्यालायत नोंदणी केलेली काही अवजड वाहने उभी करण्यात आल्याची माहिती वाहन चोरी शोध पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदेकर व पोलीस उपनिरीक्षक प्रताप देसाई यांच्या पथकाने एपीएमसीतील ट्रक टर्मिनलमध्ये उभ्या असलेल्या दोन संशयित ट्रकच्या चालकांकडे चौकशी केली असता दोन्ही वाहने मुंबई येथून एपीएमसी येथे उभी करण्यात आल्याचे व ती कमलेश मंगे व निरव ठक्कर यांच्या मालकीची असल्याची माहिती मिळाली. तसेच त्यांनी एजंटमार्फत हे दोन्ही ट्रक खरेदी केल्याचे आढळून आले.

त्यानंतर पोलिसांनी पळस्पे येथील टाटा कंपनीच्या वर्कशॉपमध्ये तांत्रिक तज्ज्ञांमार्फत यातील दोन्ही ट्रकची तपासणी केली असता दोन्ही ट्रक टाटा कंपनीकडून बनवण्यात आले नसल्याचे तसेच दोन्ही वाहनांच्या चेसीस नंबर मध्ये फेरबदल करण्यात आल्याचे उघड झाले. त्यानंतर पोलिसांनी दोन्ही वाहनांच्या कागदपत्रांची व चेसीस नंबरची पडताळणी केली. या तपासणीत दोन्ही वाहनांचे मूळ चेसीस नंबरमध्ये फेरबदल करुन दोन्ही वाहनांची बनावट कागदपत्रांच्या आधारे नागरपूर येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात नोंदणी करण्यात आल्याचे व त्यानंतर या ट्रकची मुंबईत विक्री करण्यात आल्याचे आढळून आले. त्यानंतर मोटरवाहन चोरी पथकाने हे दोन्ही ट्रक ताब्यात घेऊन अज्ञात टोळीचा शोध सुरू केला आहे.

## भिवंडीत दोन अल्पवयीन मुले बेपत्ता

**भिवंडी** : भिवंडी शहर परिसरात राहणारे दोन अल्पवयीन मुले एकाच दिवसात बेपत्ता झाल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली असून यामुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. भिवंडी शहरातील समरूबाग कदिम मस्जिद जवळ सुभाष नगर येथे राहणारा मुलगा घरातून निघून गेला. तर दुसऱ्या घटनेत याच पोलिस ठाणे हद्दीतील आजमीनगर,टिपु सुलतान चौक परिसरात राहणारा मुलगा घरा बाहेर गेला,पुन्हा घरी न परतल्याने कुटुंबियांनी शोध घेतला.पण तो न सापडल्याने अखेर भोईवाडा पोलिस ठाण्यात मोहम्मद कासिम हबीब मंन्सुरी यांनी तक्रार दाखल केली आहे. या दोन्ही घटना भोईवाडा पोलिस ठाणे हद्दीत घडल्या.

# 'त्या' तहसीलदारांविरोधात अखेर गुन्हा दाखल

## ▌भ्रष्ट व गैरमार्गाने उत्पन्नापेक्षा ९९ टक्के अधिकची मालमत्ता कमावल्याचे उघड ▌तहसीलदारांचे पतीदेखील एसीबीच्या रडारवर

**नवी मुंबई** : दोन लाखांची लाच स्वीकारल्यामुळे निलंबित करण्यात आलेल्या अलिबागच्या तत्कालीन तहसीलदार मीनल दळवी यांनी त्यांच्या सेवाकाळात भ्रष्ट व गैरमार्गाने तब्बल २ कोटी ६२ लाखांहून अधिकची संपत्ती कमावल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) केलेल्या तपासणीत उघडकीस आले आहे. तसेच मीनल दळवी यांना त्यांच्या पतीने अपसंपदा मिळवण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे नवी मुंबई एसीबीने मीनल कृष्णा दळवी आणि त्यांचे पती कृष्णा वसंत दळवी या दोघांविरोधात अपसंपदा केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

नोव्हेंबर २०२२ मध्ये मीनल दळवी या अलिबागच्या तहसीलदार या पदावर असताना त्यांनी वडिलोपार्जित आईकडून बक्षीसपत्र स्वरूपात मिळालेल्या जमिनीच्या सातबाऱ्यावर मुलाच्या नावाची नोंद करण्यासाठी तसेच याबाबत असलेल्या अपिलावर तक्रारदाराच्या बाजूने निकाल देण्यासाठी राकेश चव्हाण या खासगी व्यक्तीच्या माध्यमातून २ लाख रुपयांची लाच स्वीकारली होती. त्यावेळी नवी मुंबई एसीबीच्या पथकाने तहसीलदार मीनल दळवी यांना तसेच खासगी व्यक्ती राकेश चव्हाण या दोघांना रंगेहाथ पकडले होते. त्यानंतर मीनल दळवी व राकेश चव्हाण या दोघांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर एसीबीच्या महासंचालकांनी मीनल दळवी यांच्या मालमत्तेची उघड चौकशी करण्याचे आदेश दिले होते.

त्यानुसार नवी मुंबई एसीबीचे पोलीस उपअधीक्षक शिवराज म्हेत्रे व त्यांच्या पथकाने मीनल दळवी यांच्या मालमत्तेची तपासणी केली असता, मीनल दळवी यांनी त्यांच्या सेवा कालावधीत व परीक्षण कालावधी दरम्यान, भ्रष्ट व गैरमार्गाने त्यांच्या उत्पन्नापेक्षा अधिक किमतीची तब्बल २ कोटी ६२ लाख इतक्या रकमेची (९८.९७ टक्के) मालमत्ता संपादित केल्याचे आढळून आले. त्याचप्रमाणे मीनल दळवी यांनी कमावलेली बेकायदेशीर मालमत्ता त्यांच्या पतीने स्वतःच्या नावाने बाळगून मीनल दळवी यांना बेकायदेशीरपणे अपसंपदा मिळवण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे आढळून आले. त्यामुळे नवी मुंबई एसीबीने मीनल दळवी व त्यांचे पती कृष्णा दळवी या दोघांविरोधात एपीएमसी पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम १३(१)(ब), १३(२),१२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# सुट्टी रद्द केल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष

## म्युनिसिपल कर्मचारी सेनेनेही दर्शवला विरोध

**कल्याण** : कल्याण - डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड यांनी पालिका कर्मचाऱ्यांच्या शुक्रवारपासून सलग लागून आलेल्या सार्वजनिक सुट्टीसह साप्ताहिक सुट्टया रद्द करण्याचे आदेश काढले आहेत. त्यामुळे पालिका कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे. पालिकेतील मान्यता कामगार संघटना असलेल्या म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेनेही या निर्णयास विरोध दर्शवत आयुक्तांना नाराजीचे पत्र पाठवले आहे.

शुक्रवार दि. ८ मार्च रोजी महाशिवरात्रीनिमित्त सार्वजनिक सुट्टी आहे. तर शनिवार, रविवार साप्ताहिक सुट्टी आहे. त्यामुळे सलग लागून आलेल्या सुट्टयांमुळे पालिका कर्मचारी आनंदात होते. मात्र आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड यांनी बुधवारी एक परिपत्रक काढले. हे तिन्ही दिवस सार्वजनिक सुट्टी असली तरी पालिकेचे प्रत्येक कार्यालय सुरू राहील. तसेच सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेले नित्याचे कामकाज करायचे असल्याचे आदेश दिले.

या कलावधीतील विभाग निहाय बायोमेट्रिक हजेरीचा अहवाल आयुक्त कार्यालयात सादर करण्याचे निर्देशही त्यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्तांना यावेळी दिले.आयुक्तांच्या या फतव्यामुळे तीन दिवस सलग सुट्टी मिळण्याच्या खूशीत असलेल्या पालिका कर्मचाऱ्यांच्या आनंदावर मात्र विरजण पडले.

म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचे अध्यक्ष बाळ हरदास यांनी थेट आयुक्तांना पत्र पाठवत सार्वजनिक सुट्टी रद्द करण्याच्या निर्णयास विरोध दर्शवला. राज्यात कोणतीही आणीबाणी सदृश्य परिस्थिती नसतांना सार्वजनिक सुट्टी रद्द करण्याचे प्रयोजन काय? तसेच सुट्टीच्या कालावधीतील दिवसाचे दुप्पट वेतन देणार का असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.